## आजचे पंचांग

शुक्रवार, दि. १ मे २०२६
द्वितीय परार्ध, श्वेतवाराह कल्प, वैवस्वत मन्वंतर, युगाब्द ५१२८, शालिवाहन शक १९४८, विक्रम संवत २०८२, पराभवनाम संवत्सर, उत्तरायण, वसंत ऋतु, वैशाख मास, शुक्लपक्ष, पौर्णिमा रात्री १०-५३पर्यंत, दिवस नक्षत्र– स्वाती रात्री ४-३५ पर्यंत नंतर विशाखा,
चंद्र रास- तुला, सूर्य रास - मेष, गुरु रास - मिथुन

# दैनिक राज्य लोकतंत्र

नवी दिशा... नवे विचार...






आरएनआय : MAHMAR/2021/85884 | शुक्रवार, दि. १ मे, २०२६ | वर्ष - १ | अंक - २१६ | पाने - ४ | पुणे/पिंपरी-चिंचवड


### वाचकांना निवेदन

- आज १ मे रोजी महाराष्ट्र दिनाची सुट्टी असल्याने दैनिक राज्य लोकतंत्रचे कार्यालय बंद राहील. त्यामुळे उद्या, म्हणजेच दि. २ मे रोजी अंक प्रकाशित होणार नाही. याची सर्व संबंधितांनी नोंद घ्यावी.

- **संपादक,**
**दैनिक राज्य लोकतंत्र**

## सारांश वृत्त

### द्वारका येथील बेकायदा बांधकामे हटवली

**देवभूमी द्वारका :** गुजरातमधील देवभूमी द्वारका प्रशासनाने बेकायदा बांधकामे पाडण्यासाठी मोहीम राबवली, ज्यामुळे सुमारे २.२७ कोटी रुपये किंमतीची सुमारे २,४०० चौरस मीटर सरकारी जमीन मोकळी करण्यात आली, अशी माहिती एका अधिकाऱ्याने गुरुवारी दिली. देवभूमी द्वारकाचे उपविभागीय दंडाधिकारी अमोल आवटे यांनी सांगितले की, सर्व बेकायदा बांधकामे किनारपट्टीपासून सुमारे २०० ते ४०० मीटर अंतरावर आहेत, तर एक इमारत ५० मीटरच्या जवळ आहे.

### महाराष्ट्र पोलिसांत मोठे फेरबदल

**मुंबई :** महाराष्ट्र पोलीस दलात फेरबदल करण्यात आले आहेत. सरकारच्या गृह विभागाने २१ वरिष्ठ पोलीस अधिकाऱ्यांच्या बदल्यांची घोषणा केली आहे. यामध्ये भारतीय पोलीस सेवा अर्थात आयपीएस आणि राज्य पोलीस सेवेतील बड्या अधिकाऱ्यांचा समावेश आहे. आगामी काळातील आव्हाने आणि प्रशासकीय गरजा लक्षात घेऊन ही मोठी फेरबदल करण्यात आली असून अनेक जिल्ह्यांना आता नवे पोलीस अधीक्षक मिळाले आहेत. राजकीय आणि प्रशासकीय निकड लक्षात घेऊन गृह विभागाने ही पावले उचलली आहेत.

### इराणसाठी सहा भूमार्ग खुले करत दिला मोठा दणका

# पाकिस्तानने दिला अमेरिकेला धोका

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**नवी दिल्ली :** जागतिक राजकारणात शांतता चर्चेसाठी मध्यस्थीचा आव आणणाऱ्या पाकिस्तानचा खरा चेहरा पुन्हा एकदा समोर आला आहे. अमेरिकेने होर्मुझच्या सामुद्रधुनीत नाकेबंदी करून इराणची आर्थिक कोंडी केली असताना, पाकिस्तानने इराणला मदतीचा हात दिला आहे. इराणला आपला व्यापार सुरळीत ठेवता यावा, यासाठी पाकिस्तानने आपल्या भूप्रदेशातून तब्बल सहा व्यापारी मार्ग उपलब्ध करून दिले आहेत. पाकिस्तानच्या या निर्णयामुळे अमेरिका संतापली असून, इस्लामाबाद पुन्हा एकदा दुटप्पी भूमिका घेत असल्याचा आरोप होत आहे.



होर्मुझच्या सामुद्रधुनीतील नाकेबंदीमुळे इराणचा समुद्री व्यापार ठप्प झाला आहे. मात्र, पाकिस्तानने दिलेल्या या सहा नवीन भूमार्गांमुळे इराणला आता रशिया, चीन आणि इतर मित्रराष्ट्रांशी व्यापार करणे सहज शक्य होईल. यामुळे अमेरिकेने इराणवर लादलेल्या आर्थिक निर्बंधांची धार कमी होणार आहे. पाकिस्तान सरकारने या सहा मार्गांची अधिकृत घोषणा केल्यानंतर आंतरराष्ट्रीय स्तरावर खळबळ माजली आहे. अमेरिकेचे राष्ट्रीय सुरक्षा विशेषज्ञ डेरेक ग्रॉसमन यांनी पाकिस्तानच्या या भूमिकेवर तीव्र आक्षेप घेतला आहे. त्यांनी 'एक्स'वर (ट्विटर) पोस्ट करत ट्रम्प प्रशासनाला सावध केले आहे. ग्रॉसमन म्हणाले, "ट्रम्प प्रशासन, तुमच्यासमोर आता एक मोठी समस्या उभी ठाकली आहे. तुमचा जवळचा मित्र म्हणवून घेणारा पाकिस्तान आता उघडपणे इराणला मदत करत आहे. अमेरिकेने इराणवर जो दबाव निर्माण केला होता, त्याला या सहा मार्गांमुळे खिळ बसणार आहे. या मार्गांतून इराण कोणत्याही अडथळ्याशिवाय इंधन व्यापार करू शकतो. पाकिस्तान पुन्हा एकदा अमेरिकेसोबत दुटप्पी खेळी खेळत आहे."

पाकिस्तानच्या या भूमिकेमुळे त्यांच्या 'मध्यस्थ' असण्याच्या विश्वासार्हतेवर प्रश्नचिन्ह उपस्थित झाले आहे. यापूर्वी इस्रायलने देखील पाकिस्तानवर अविश्वास दाखवला होता. ज्या इराणसाठी पाकिस्तानने हे धाडस केले आहे, त्याच इराणने देखील त्यांच्यावर शंका घेतली आहे. इराणच्या राष्ट्रीय सुरक्षा आणि परराष्ट्र धोरणाचे प्रवक्ते दाशतेस्तान यांनी म्हटले की, "पाकिस्तान इराणचा चांगला मित्र नक्कीच आहे, पण मध्यस्थ म्हणून तो योग्य नाही." होर्मुझमधील नाकेबंदीच्या माध्यमातून इराणची आर्थिक रसद तोडून त्यांना चर्चेच्या टेबलावर आणण्याची रणनीती ट्रम्प प्रशासनाने आखली होती. पाकिस्तानने दिलेले हे मार्ग अमेरिकेच्या प्रयत्नांना धक्का मानले जात आहेत. यामुळे आखाती देशांमधील तणाव आणखी वाढण्याची शक्यता आहे.

## एक्झिट पोल हा मानसिक दबावाचा डाव

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**कोलकाता :** भाजपला आघाडी दाखवणारे एक्झिट पोल हे तृणमूल काँग्रेस (टीएमसी) कार्यकर्त्यांचे मनोधैर्य खच्ची करण्यासाठी रचलेले आहेत, असा आरोप पश्चिम बंगालच्या मुख्यमंत्री ममता बॅनर्जी यांनी केला आहे. टीएमसी २२६ पेक्षा अधिक जागा जिंकून स्पष्ट बहुमत मिळवेल, असा ठाम विश्वासही त्यांनी व्यक्त केला.

एक्झिट पोल फेटाळताना त्यांनी म्हटले की, भाजपला आधीपासूनच माहिती आहे की टीएमसीचा वेग रोखणे त्यांना शक्य नाही. त्यामुळे जनतेची मानसिकता बदलण्यासाठी आणि कार्यकर्त्यांमध्ये संभ्रम निर्माण करण्यासाठी अशा प्रकारचे अंदाज जाणीवपूर्वक पसरवले जात आहेत.

मुख्यमंत्र्यांनी पक्षाच्या कार्यकर्त्यांना विशेष सूचना देताना मतमोजणी केंद्रांवर चोवीस तास सतर्क राहण्याचे आवाहन केले. दिवसा कार्यकर्ते तैनात ठेवा, तर रात्रीची जबाबदारी नेत्यांनी स्वतः घ्यावी, असे त्यांनी सांगितले. "मी स्वतः पहारा देऊ शकते, तर तुम्हीही देऊ शकता," असे म्हणत त्यांनी कार्यकर्त्यांना रात्रभर जागे राहण्याचे निर्देश दिले.

४ मे रोजी होणाऱ्या मतमोजणीच्या पार्श्वभूमीवर सर्व २९४ मतदारसंघांतील मतमोजणी केंद्रांवर उमेदवार आणि वरिष्ठ नेत्यांनी वैयक्तिक लक्ष ठेवावे, असेही त्यांनी स्पष्ट केले.

बॅनर्जी यांनी २०१६ आणि २०२१ च्या निवडणुकांचा उल्लेख करत म्हटले की, त्या वेळीही एक्झिट पोलने भाजपला आघाडी दाखवली होती; मात्र प्रत्यक्ष निकाल पूर्णपणे वेगळे लागले. "वारंवार हेच चित्र दिसते—एक्झिट पोल भाजपच्या बाजूने झुकलेले असतात," असे त्यांनी नमूद केले.

## बच्चू कडू यांचा शिवसेनेत प्रवेश

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**मुंबई :** प्रहार जनशक्तीचे प्रमुख आणि माजी आमदार बच्चू कडू यांनी गुरुवारी मुंबईत आपल्या कार्यकर्त्यांसह शिवसेनेत अधिकृत प्रवेश केला.

उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या उपस्थितीत कडू यांनी शिवसेनेचे प्राथमिक सदस्यत्व स्वीकारले. त्यानंतर शिंदे यांनी तात्काळ विधानपरिषद निवडणुकीसाठी शिवसेनेचे अधिकृत उमेदवार म्हणून कडू यांच्या नावाची घोषणा केली.

प्रवेशानंतर बोलताना बच्चू कडू यांनी स्पष्ट केले की, हा निर्णय केवळ पदासाठी नसून दिव्यांग, शेतकरी आणि कष्टकरी वर्गाच्या प्रश्नांवर सखोल चर्चा केल्यानंतरच घेतला आहे. "जिथे राहू, तिथे प्रामाणिकपणे आणि पूर्ण ताकदीने काम करू. शिंदे यांच्या नेतृत्वाखालीच आमचा राजकीय प्रवास पुढे जाईल," असे त्यांनी सांगितले. शिंदे यांच्या कार्यपद्धतीचे कौतुक करताना त्यांनी म्हटले की, त्यांचा स्वभाव सेवाभावी आहे. वर्षा बंगल्याची दारे सामान्यांसाठी कायम खुली असतात. दिव्यांग मंत्रालय स्थापन करण्याचा निर्णय ऐतिहासिक होता, तर कर्जमाफीसारख्या निर्णयांमुळे शेतकऱ्यांना दिलासा मिळाला.

कडू यांनी स्पष्ट केले की, प्रहार संघटना सामाजिक क्षेत्रात काम करत राहील, तर राजकीय भूमिका शिवसेनेच्या माध्यमातून पुढे नेली जाईल.

उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनीही प्रहार संघटनेच्या कामाचे कौतुक करत म्हटले की, "प्रहार ही सामाजिक संघटना असून ती आता शिवसेनेशी संलग्न राहील. त्यामुळे संघटनेला अधिक बळ मिळेल."

### दोन महिन्यांत तिसऱ्यांदा घेतली माघार

# महाविकास आघाडीत काँग्रेस बॅकफूटवर?

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**मुंबई :** महाविकास आघाडीत सध्या मतभेदाचे वारे वाहत असून, त्याचा सर्वाधिक फटका काँग्रेसला बसत असल्याचे चित्र आहे. राष्ट्रीय पातळीवर सत्तेची स्वप्ने पाहणाऱ्या काँग्रेसला महाराष्ट्रात मात्र मित्रपक्षांसमोर वारंवार माघार घ्यावी लागत असल्याने राजकीय वर्तुळात चर्चेला उधाण आले आहे. गेल्या दोन महिन्यांत काँग्रेसने तब्बल तीन वेळा पावले मागे घेतल्याचे दिसून आले आहे.

पहिली वेळ ५ मार्च रोजी, जेव्हा शरद पवार यांना पाठिंबा देण्यासाठी काँग्रेसने राज्यसभेच्या निवडणुकीतून माघार घेतली. यानंतर ९ एप्रिलला बारामती पोटनिवडणुकीत सुप्रिया सुळे यांच्या गटाला अनुकूल भूमिका घेत आपल्या उमेदवाराला अर्ज मागे घ्यायला लावला. आता विधानपरिषद निवडणुकीत उबाठाच्या अंबादास दानवे यांच्या उमेदवारीसाठी काँग्रेसने अखेरच्या क्षणी माघार घेत 'हॅट्रिक' पूर्ण केली.



या निवडणुकीत उद्धव ठाकरे स्वतः उमेदवारी दाखल करतील, असा काँग्रेसचा अंदाज होता. मात्र अर्ज भरण्याच्या अवघ्या २४ तास आधी अंबादास दानवे यांचे नाव जाहीर करून ठाकरेंनी काँग्रेसला अनपेक्षित धक्का दिला. त्यामुळे काँग्रेसकडे पर्यायच उरला नाही. सुरुवातीला काँग्रेसने स्वतःचा उमेदवार देण्याची भूमिका घेतली होती. मात्र, नंतर झालेल्या चर्चेनंतर त्यांनी पुन्हा माघार घेतली. या घडामोडीत काँग्रेसी नेत्यांशी ठाकरेंनी वारंवार संपर्क साधत परिस्थिती हाताळल्याची माहिती समोर आली आहे.

सुमारे अडीच तास चाललेल्या या चर्चेनंतर काँग्रेसने दानवे यांना पाठिंबा दिला. मात्र हा पाठिंबा काही अटींवर आधारित असल्याचे सांगितले जाते. भविष्यातील राज्यसभा आणि विधानपरिषद जागांमध्ये काँग्रेसला संधी देण्याचे आश्वासन दिल्यानंतरच हा तिढा सुटल्याचे सूत्रांचे म्हणणे आहे.

या सर्व घडामोडीत शरद पवार गट मात्र दूर राहिल्याचे दिसले. वाद सुरू असताना पक्षाचे प्रमुख नेते चर्चेत दिसले नाहीत. शेवटच्या टप्प्यात सुप्रिया सुळे उपस्थित राहिल्यानेच घडामोडींना पूर्णविराम मिळाला. वारंवार माघार घेतल्याने काँग्रेसची महाविकास आघाडीत नेमकी भूमिका काय आहे, असा प्रश्न उपस्थित होत आहे. मित्रपक्षांच्या दबावाखाली निर्णय घ्यावे लागत असल्याने काँग्रेसला दुय्यम स्थान दिले जात आहे का, अशी चर्चा सुरू झाली आहे.

लढण्याआधीच माघार घेण्याची ही मालिका काँग्रेसच्या संघटनात्मक ताकदीवर प्रश्नचिन्ह उभे करत असून, आगामी निवडणुकांमध्ये त्याचा परिणाम होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

### उच्च न्यायालयाच्या निर्णयाने खळबळ

# गोकुळ दूध संघावर प्रशासकाचा मार्ग मोकळा

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**कोल्हापूर :** जिल्ह्याची आर्थिक रक्तवाहिनी मानल्या जाणाऱ्या गोकुळ दुध संघाच्या राजकारणात मोठी खळबळ उडाली आहे. मुंबई उच्च न्यायालयाच्या कोल्हापूर सर्किट बेंचने दिलेल्या महत्त्वपूर्ण निर्णयामुळे गोकुळवर प्रशासक नेमण्याचा मार्ग मोकळा झाला असून, सत्ताधारी महायुतीतील दिग्गज नेत्यांना मोठा राजकीय धक्का बसल्याचे मानले जात आहे. विशेषतः हसन मुश्रीफ यांच्या गटासाठी हा निर्णय संवेदनशील ठरला आहे.

गोकुळ दूध संघाच्या विद्यमान संचालक मंडळाची मुदत ४ मे २०२६ रोजी संपत आहे. नियमानुसार या आधी निवडणूक प्रक्रिया पूर्ण होणे आवश्यक होते. मात्र अद्याप निवडणुकीचे वेळापत्रक जाहीर झालेले नाही. न्यायालयाने स्पष्ट केले आहे की, संघाशी संलग्न असलेल्या दूध संस्थांच्या पात्रतेवरील वाद निकाली निघेपर्यंत निवडणूक घेता येणार नाही. त्यामुळे ४ मेनंतर संघाचा कारभार लोकप्रतिनिधींकडून काढून तो प्रशासकाकडे जाण्याची शक्यता बळावली आहे.

या वादाचा केंद्रबिंदू म्हणजे मतदानाचा हक्क असलेल्या १३२० दूध संस्थांची पात्रता. या संदर्भात प्रकाश बेलवाडे यांनी न्यायालयात याचिका दाखल केली होती. त्यात मोठ्या संख्येने संस्था अपात्र ठरू शकतात, अशी शक्यता व्यक्त करण्यात आली आहे. या संस्था निवडणुकीत निर्णायक मतदार ठरतात. त्यामुळे या मुद्द्यावर अंतिम निर्णय होईपर्यंत निवडणूक प्रक्रिया पूर्णपणे ठप्प राहणार आहे.

सध्या संघाचे अध्यक्ष नवीद मुश्रीफ असून, या निर्णयाचा परिणाम थेट हसन मुश्रीफ यांच्या गटावर होणार आहे. या गटात प्रकाश आबिटकर, विनय कोरे, चंद्रदीप नरके, राजेंद्र पाटील यड्रावकर आणि सतेज पाटील यांसारख्या नेत्यांचा समावेश आहे. न्यायालयीन निर्णयामुळे त्यांच्या निवडणूक तयारीला ब्रेक लागला असून, विरोधकांना वेळ मिळाल्याचे मानले जाते. संस्थांच्या पात्रतेवरील सुनावणी पूर्ण होण्यासाठी मोठा कालावधी लागू शकतो, त्यामुळे किमान एक वर्ष निवडणूक होण्याची शक्यता कमी असल्याचा दावा करण्यात आला. गोकुळच्या इतिहासात प्रथमच प्रशासक नेमण्याची वेळ येण्याची शक्यता वर्तवली जात आहे. ४ मे रोजी मुदत संपल्यानंतर ५ मे रोजी कोणाला प्रशासक म्हणून नियुक्त केले जाते, याकडे संपूर्ण कोल्हापूर जिल्ह्याचे लक्ष लागले आहे.

### बस स्थानकावर नाथजल १५ रुपयांनाच

**पुणे :** 'उन्हाळ्यात बसस्थानकावर येणाऱ्या प्रवाशांना 'नाथजल'चे थंडगार पाणी केवळ १५ रुपयांना मिळाले पाहिजे. किंमत वाढवून विक्री करताना आढळल्यास संबंधितांचा विक्री परवाना रद्द केला जाईल,' असा इशारा परिवहन मंत्री तथा एसटी महामंडळाचे (एसटी) अध्यक्ष प्रताप सरनाईक यांनी गुरुवारी दिला. परिवहन मंत्री तथा महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाचे अध्यक्ष प्रताप सरनाईक यांनी गुरुवारी सकाळी पुणे विभागातील लोणावळा बसस्थानकाला स भेट दिली. या बसस्थानकावरील प्रवासी सेवा-सुविधांची प्रत्यक्ष पाहणी केली, त्यावेळी माध्यमांशी बोलताना त्यांनी हा इशारा दिला.

## राज्य सरकारचा मोठा दिलासा

### महाराष्ट्र दिनी १२ नव्या डायलिसीस केंद्रांचे लोकार्पण

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**मुंबई :** राज्यातील किडनी विकारग्रस्त रुग्णांसाठी दिलासादायक निर्णय घेत, "महाडायलिसीस" योजनेचा विस्तार करण्यात येत आहे. महाराष्ट्र दिनानिमित्त १ मे रोजी राज्यभरात १२ नव्या डायलिसीस केंद्रांचे लोकार्पण करण्यात येणार असून, ग्रामीण भागातील रुग्णांना याचा मोठा फायदा होणार आहे. सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याणमंत्री प्रकाश आबिटकर यांच्या हस्ते हे लोकार्पण दूरदृश्य प्रणालीद्वारे होणार आहे.

राज्यात सध्या "महाडायलिसीस" योजनेअंतर्गत ९२ केंद्रे कार्यरत असून त्यामध्ये ५५८ डायलिसीस बेड्स उपलब्ध आहेत. नव्या १२ केंद्रांच्या समावेशामुळे ही संख्या वाढून १०४ वर पोहोचणार आहे. या योजनेचा मुख्य उद्देश म्हणजे ग्रामीण रुग्णालये, उपजिल्हा रुग्णालये आणि जिल्हा रुग्णालयांमध्ये मोफत डायलिसीस सेवा उपलब्ध करून देणे, जेणेकरून रुग्णांना शहरांकडे धाव घेण्याची गरज भासणार नाही. ग्रामीण रुग्णालयांत किमान ५ बेड्स, तर उपजिल्हा व जिल्हा रुग्णालयांत ८ ते १० डायलिसीस बेड्सची सुविधा उपलब्ध करून देण्यात आली आहे. ही योजना पूर्णपणे डिजिटल प्लॅटफॉर्मवर आधारित असून संकेतस्थळ आणि मोबाईल अॅपद्वारे रुग्णांना सेवा उपलब्ध आहेत. ऑनलाईन स्लॉट बुकिंगमुळे प्रतीक्षा कालावधी कमी झाला आहे. येथे प्रशिक्षित तंत्रज्ञ, नर्सेस आणि सहाय्यक कर्मचारी कार्यरत असून तज्ज्ञ नेफ्रोलॉजिस्ट यांच्या मार्गदर्शनाखाली उपचार दिले जातात. रक्त तपासणी, आवश्यक इंजेक्शन्स आणि सल्ला यांसारख्या सेवा रुग्णांना मोफत आहेत. ही योजना केंद्र शासनाच्या आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्रालयाअंतर्गत राबवली जात आहे.

### गिनीज बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्डसमध्ये होणार समावेश

# मुंबई-पुणे 'मिसिंग लिंक'ने घडवला जागतिक विक्रम

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**मुंबई :** मुंबई आणि पुणे या दोन महत्त्वाच्या शहरांमधील अंतर केवळ वेळेच्या दृष्टीनेच नव्हे, तर दर्जेदार पायाभूत सुविधांच्या माध्यमातूनही कमी करण्याच्या दिशेने मोठे पाऊल उचलले गेले आहे. खंडाळा घाटातील कठीण डोंगराळ भागात उभारलेला 'मिसिंग लिंक' प्रकल्प आता जागतिक स्तरावर झळकण्याच्या तयारीत आहे. या प्रकल्पातील २३.७५ मीटर रुंदीचे जुळे बोगदे हे जगातील सर्वात रुंद बोगदे ठरले असून, त्यांच्या नावाची नोंद 'गिनीज बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्ड्स'मध्ये होण्याची शक्यता आहे.



महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाचे व्यवस्थापकीय संचालक अनिल कुमार गायकवाड यांनी दिलेल्या माहितीनुसार, या बोगद्यांमधून एकाच वेळी दहा पदरी वाहतूक शक्य होणार आहे. प्रकल्पाचा आणखी एक महत्त्वाचा भाग म्हणजे सुमारे १३२ मीटर उंचीवरील केबल-स्टेड पूल, जो आधुनिक स्थापत्यशास्त्राचा उत्कृष्ट नमुना मानला जात आहे. कठीण भौगोलिक परिस्थितीत हा प्रकल्प उभारणे हे भारतीय अभियांत्रिकी कौशल्याचे द्योतक ठरत आहे.

सध्या खंडाळा घाटातील वळणावळणाच्या आणि धोकादायक रस्त्यांमुळे प्रवाशांना अनेक अडचणींचा सामना करावा लागतो. पावसाळ्यात दरडी कोसळणे, दाट धुके आणि वाहतूक कोंडी ही नेहमीची समस्या असते. 'मिसिंग लिंक' प्रकल्पामुळे अशा सुमारे दहा धोकादायक वळणांना बायपास करण्यात आले आहे. यामुळे मुंबई–पुणे प्रवासात किमान २५ मिनिटांची बचत होणार असून, वाहनांचा वेग ताशी १०० किमीपर्यंत राहू शकणार आहे. या मार्गाचे उद्घाटन १ मे रोजी करण्यात येणार आहे.

पहिल्या टप्प्यात ३१ ऑक्टोबर २०२६ पर्यंत केवळ कार आणि बससारख्या हलक्या वाहनांनाच प्रवेश दिला जाईल. सुरक्षेच्या दृष्टीने अवजड वाहनांना तात्पुरती बंदी घालण्यात आली आहे. विशेष म्हणजे, या अत्याधुनिक मार्गासाठी प्रवाशांना कोणताही अतिरिक्त टोल आकारला जाणार नाही. सह्याद्रीच्या कुशीत उभारलेला हा प्रकल्प 'झिरो-ग्रेडियंट' तंत्रज्ञानावर आधारित असून, सुरक्षितता आणि वेग यांचा उत्तम समतोल साधतो. खंडाळा घाटातील वाहतूक कोंडी कमी करण्यासाठी 'मिसिंग लिंक' हा प्रकल्प मैलाचा दगड ठरणार आहे.

## मुलाखतीसाठी पात्र उमेदवारांना अर्थसहाय्य

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**मुंबई :** केंद्रीय सशस्त्र पोलीस दल (सीएपीएफ) परीक्षेत यश मिळवून मुलाखतीसाठी पात्र ठरलेल्या अनुसूचित जातीच्या उमेदवारांसाठी दिलासादायक निर्णय घेण्यात आला आहे. बार्टीच्या माध्यमातून अशा उमेदवारांना मुलाखतपूर्व तयारीसाठी प्रति विद्यार्थी २५ हजारांचे आर्थिक साहाय्य देण्यात येणार आहे. या योजनेचा लाभ राज्यातील जास्तीत जास्त पात्र उमेदवारांनी घ्यावा, असे आवाहन बार्टीकडून करण्यात आले आहे.

यूपीएससीने १७ एप्रिल रोजी सीएपीएफ मुख्य परीक्षेचा निकाल जाहीर केला आहे. या निकालात मुलाखतीसाठी पात्र ठरलेल्या महाराष्ट्रातील अनुसूचित जातीच्या उमेदवारांना या योजनेचा लाभ दिला जाणार आहे.

मुलाखत प्रक्रियेपूर्वी उमेदवारांना आर्थिक अडचणींचा सामना करावा लागू नये, यासाठी हे साहाय्य दिले जाणार आहे. या आर्थिक सहाय्यातून उमेदवारांचा प्रवास खर्च, निवास व्यवस्था, भोजन तसेच आवश्यक शैक्षणिक साहित्याचा खर्च भागवता येणार आहे.

ही रक्कम प्रति उमेदवार एकरकमी देण्यात येणार आहे. योजनेचा सविस्तर तपशील, जाहिरात आणि अर्जाचा नमुना बार्टीच्या अधिकृत संकेतस्थळावर उपलब्ध करून देण्यात आला आहे. पात्र उमेदवारांनी ऑनलाईन पद्धतीने अर्ज करणे आवश्यक आहे, असे संस्थेने एका पत्रकाद्वारे कळवले आहे.

# आयोगाचा पांगुळगाडा आणि बंगाली 'खेला'

## संपादकीय

### राजमुकुटाखालची लोकशाहीची प्रवचने



**लोकशाहीच्या सर्वोच्च मंदिरात वारसाहक्काने मिळालेल्या राजमुकुटाने प्रवचन झेंडावे, यासारखा दुसरा विदारक विरोधाभास असू शकत नाही. किंग चार्ल्स यांनी लोकशाही मूल्यांवर दिलेले भाष्य हे वैचारिक वाटत असले, तरी ते जागतिक संस्थात्मक ऱ्हासाचे आणि नैतिक पोकळीचे लक्षण आहे.**

लोकशाहीत लोकप्रतिनिधींनी लोकांसाठी काय करावे, याच्या चर्चा होणे हे त्या व्यवस्थेचे लक्षण आहे. पण जेव्हा वारसाहक्काने मिळालेल्या गादीवर बसलेला एखादा राजा, निवडून आलेल्या प्रतिनिधींच्या सभागृहात उभा राहून लोकशाहीच्या मूल्यांचे 'प्रवचन' देऊ लागतो, तेव्हा समजावे की जागतिक राजकारणात काहीतरी मूलभूत बिघडले आहे. किंग चार्ल्स यांनी नुकतेच फ्रान्समध्ये दिलेले भाषण हे याचेच निदर्शक. ज्या ब्रिटनने जगाला 'मॅग्ना कार्टा' दिला आणि ज्या संसदेने राजसत्तेच्या वरचढ होण्यासाठी शतकानुशतकांचा रक्तरंजित लढा दिला, त्याच परंपरेचा वारसदार आज लोकशाहीच्या रक्षणाची भाषा करतो, हे चित्र ऐतिहासिकदृष्ट्या विसंगत आणि व्यावहारिकदृष्ट्या उपरोधिक आहे. खरे तर, राजाने प्रवचन द्यावे आणि प्रजेने ते निमूटपणे ऐकावे, हा काळ आता इतिहासाच्या जमाखर्चात जमा झाला आहे. आज जगभर लोकशाहीचा 'पांगुळगाडा' डळमळीत झाला आहे. रशिया-युक्रेन युद्धापासून ते इस्रायल-गाझा संघर्षापर्यंत आणि युरोपातील वाढत्या उजव्या टोकाच्या विचारसरणीच्या प्रभावापर्यंत, निवडून आलेल्या नेत्यांची विश्वासार्हता धुक्यात हरवली आहे. जेव्हा सत्तेच्या हव्यासापोटी निवडून आलेले हुकूमशहा संस्थांचा गळा घोटू लागतात, तेव्हा ज्यांचे पद केवळ प्रतीकात्मक आहे, अशा राजाला लोकशाहीचे तत्त्वज्ञान सांगावे लागते. यात त्या राजाचे मोठेपण नसून निवडून आलेल्या जागतिक नेतृत्वाचा हा नैतिक पराभव आहे. ब्रिटनचा इतिहास हा वसाहतवादाचा आणि साम्राज्यवादाचा इतिहास आहे. ज्यांच्या पूर्वजांनी जगभर लोकशाहीच्या नावाखाली अनियंत्रित सत्ता गाजवली, त्यांच्याच वंशजांनी आज लोकशाहीच्या संवर्धनाची चिंता व्यक्त करावी, याला काळाचा महिमा म्हणावे की ऐतिहासिक विस्मृती? लोकशाही ही केवळ पाच वर्षांतून एकदा मतदान करण्यापुरती मर्यादित नसते; ती संस्थांच्या स्वायत्ततेत, अल्पसंख्याकांच्या अधिकारात आणि वैचारिक स्वातंत्र्यात असते. दुर्दैवाने, आज अनेक विकसनशील आणि विकसित देशांत या संस्थांनाच सत्तेच्या 'दावणीला बांधण्याचे' काम पद्धतशीरपणे सुरू आहे. चार्ल्स यांचे भाषण हे हतबल जागतिक व्यवस्थेचे प्रतिबिंब आहे. जेव्हा राजकीय नेते आपापल्या देशांत लोकशाहीचा गळा घोटू लागतात किंवा संसदेला केवळ 'रबर स्टॅम्प' बनवतात, तेव्हा अशा राजांची भाषणे ही 'संस्थात्मक रिकामपण' भरून काढण्यासाठी वापरली जातात. लोकशाहीला संजीवनी देण्याचे काम हे रस्त्यावरच्या आंदोलनातून आणि संसदेतील प्रखर चिकित्सेतून होते, राजाच्या भाषणातून नाही. ऐतिहासिक दाखले द्यायचे झाले तर, राजेशाहीने नेहमीच स्वतःला टिकवण्यासाठी लोकशाहीच्या मुखवट्याचा सोयीस्कर वापर केला आहे. विसाव्या शतकात ब्रिटनने नाईलाजाने अनेक वसाहतींना स्वातंत्र्य दिले, पण त्या बदल्यात तिथे लोकशाही खरोखर रुजली का? लोकशाहीचा ऱ्हास हा केवळ बाह्य शत्रूंमुळे किंवा युद्धांमुळे होत नाही, तर तो अंतर्गत संस्थांच्या पोखरण्यामुळे होतो. जेव्हा निवडणूक आयोग, न्यायव्यवस्था आणि माध्यमे ही सत्तेच्या 'सोयीचे राजकारण' करू लागतात, तेव्हा लोकशाहीचा ढाचा कोसळतो. भारतीय संदर्भात पाहायचे झाले तर, आपल्याकडेही अनेक संस्थांनी आपली स्वायत्तता सत्तेच्या चरणी अर्पण केली आहे. अशा वेळी बाहेरून येणाऱ्या लोकशाहीच्या प्रवचनांचे आपण टाळ्या वाजवून स्वागत करतो, पण आपल्याच अंगणातल्या जळत्या घराकडे डोळेझाक करतो. संस्थांच्या ऱ्हासाचा प्रवास हा नेहमीच सोयीच्या मौनातून सुरू होतो. लोकशाहीचा हा खेळ आता एका विचित्र वळणावर आला आहे. एका बाजूला लोकशाहीची हत्या करणारे निवडून आलेले 'लोकप्रिय' हुकूमशहा आहेत, तर दुसऱ्या बाजूला लोकशाहीचे प्रवचन देणारे वारसाहक्क प्राप्त राजे आहेत. या दोन टोकांच्या संघर्षात सामान्य माणूस आणि त्याची मूलभूत स्वातंत्र्यं मात्र भरडली जात आहेत. असो. राजमुकुटाच्या छायेत लोकशाहीची फुले कधीच फुलत नाहीत, ती केवळ प्रदर्शनासाठी कुंडीत लावून ठेवली जातात. आजच्या जागतिक परिस्थितीत चार्ल्स यांचे भाषण हे अशाच एका प्रदर्शनातील वस्तू आहे. या रक्ताळलेल्या सावल्यांमधून लोकशाहीचा खरा सूर्य कधी बाहेर पडणार आणि संस्थात्मक पांगुळगाडा कधी स्वतंत्रपणे चालायला शिकणार, हाच आजचा खरा कळीचा प्रश्न आहे.

---

**» बंगालमधील निवडणूक प्रक्रियेवर सर्वोच्च न्यायालयाने ओढलेले ताशेरे आणि निवडणूक आयोगाच्या भूमिकेवर निर्माण झालेले प्रश्नचिन्ह, लोकशाहीतील संस्थात्मक स्वायत्ततेच्या ऱ्हासाचे प्रतिक ठरले आहे.**

लोकशाहीत निवडणुका होणे हे जितके महत्त्वाचे, तितकेच त्या निवडणुका घेणारी यंत्रणा किती निस्पृह आहे, यावर त्या प्रक्रियेची विश्वासार्हता अवलंबून असते. मात्र, सध्या पश्चिम बंगालच्या संदर्भात जे काही घडत आहे, ते पाहता 'निवडणूक आयोग' नावाच्या घटनादत्त संस्थेची स्वायत्तता धुक्यात हरवल्याचे चित्र दिसते. सर्वोच्च न्यायालयाने नुकत्याच व्यक्त केलेल्या निरीक्षणातून हेच अधोरेखित झाले आहे की, जेव्हा रक्षकच डोळ्यांवर पट्टी बांधून बसतो, तेव्हा भक्षकांचे फावते. बंगालमध्ये हिंसाचार आणि सत्ताधारी तृणमूल काँग्रेसची अरेरावी नवीन नाही. डाव्यांच्या राजवटीत जो 'कॅडर राज' होता, तोच आता 'दीदीं'च्या काळात अधिक हिंसक आणि सुसंघटित झाला आहे. पण, या हिंसाचाराला पायबंद घालण्यात आणि मतदारांना निर्भय वातावरण उपलब्ध करून देण्यात जेव्हा निवडणूक आयोग थिटा पडतो, तेव्हा प्रश्न केवळ एका राज्यापुरता मर्यादित राहत नाही.




वस्तुतः, भारतीय संविधानाने निवडणूक आयोगाला दिलेले अधिकार अफाट आहेत. टी. एन. शेषन यांच्या काळात या अधिकारांची जी चुणूक देशाने पाहिली, त्यामुळे राजकारण्यांच्या मनात धाक निर्माण झाला होता. पण आज परिस्थिती नेकीच्या विरुद्ध आहे. बंगालमध्ये जेव्हा जेव्हा निवडणुका होतात, तेव्हा केंद्रीय निमलष्करी दलांच्या तैनातीवरून किंवा मतदानानंतर होणाऱ्या रक्तरंजित हिंसाचारावरून आरोप-प्रत्यारोपांच्या फैरी झाडल्या जातात. गमतीचा भाग असा की, सत्ताधारी आणि विरोधक दोघेही आपापल्या सोयीनुसार आयोगावर टीका करत असतात. पण सर्वोच्च न्यायालयाने जेव्हा या विषयात हस्तक्षेप करण्याची गरज व्यक्त केली, तेव्हा त्याचा गर्भित अर्थ स्पष्ट असतो— घटनात्मक संस्था आपले प्राथमिक कर्तव्य पार पाडण्यात कुठेतरी कमी पडत आहेत किंवा जाणीवपूर्वक पडत आहेत.

राजकीय हिंसाचार हा बंगालच्या मातीतील डीएनए झाला आहे की काय, असा प्रश्न पडावा इतकी तिथे रक्ताची होळी खेळली जाते. निवडणुका जाहीर झाल्यापासून निकाल लागेपर्यंत आणि निकालानंतरही तिथे जी प्राणहानी होते, ती कोणत्याही सुसंस्कृत समाजाला भूषणावह नाही. अशा वेळी निवडणूक आयोगाची भूमिका एखाद्या मूक प्रेक्षकासारखी किंवा एखाद्या ठराविक शक्तीला झुकते माप देणारी वाटू लागली की, लोकशाहीचा पायाच डळमळीत होतो. न्यायालयाने व्यक्त केलेली चिंता ही केवळ प्रक्रियेबद्दल नाही, तर या पायाला लागलेल्या वाळवीबद्दल आहे. आयोगाने केवळ तटस्थ असून चालत नाही, तर ते तटस्थ असल्याचे दिसायलाही हवे. दुर्दैवाने, बंगालच्या प्रकरणात आयोगाची कृती ही संशयाच्या भोवऱ्यात अडकलेली दिसते.

या सगळ्या प्रक्रियेत सर्वात जास्त भरडला जातो तो सामान्य मतदार. लोकशाहीचा उत्सव साजरा करण्याचा प्राथमिक अधिकार असलेल्या या मतदाराला जेव्हा दहशतीच्या सावलीत आणि कोणाच्या तरी दडपणाखाली मतदान करावे लागते, तेव्हा त्या मताचे मूल्य आणि निवडणुकीचे पावित्र्य दोन्ही नष्ट होते. बंगालमधील राजकीय संस्कृती एका रात्रीत बदलणे हे कदाचित कठीण असेल, पण निवडणुका पारदर्शक आणि भयमुक्त वातावरणात घेणे हे तर प्रशासकीयदृष्ट्या शक्य आहे. तिथेच आयोग आपला प्रभाव पाडण्यात अपयशी ठरला आहे. न्यायालयाची टिप्पणी ही याच प्रशासकीय हलगर्जीपणावर ठेवलेले बोट आहे.

संस्थांच्या ऱ्हासाचा प्रवास हा नेहमीच सोयीच्या राजकारणातून सुरू होतो. जेव्हा सनदी अधिकारी आणि घटनात्मक पदांवर बसलेले लोक आपल्या कर्तव्यापेक्षा सत्तेच्या मर्जीला अधिक प्राधान्य देऊ लागतात, तेव्हा प्रशासनाचा 'पांगुळगाडा' तयार होतो. हा पांगुळगाडा मग केवळ सत्ताधाऱ्यांच्या इशाऱ्यावर चालतो. न्यायालयाने दिलेली चपराक ही केवळ निवडणूक आयोगाला नाही, तर अशा प्रत्येक संस्थेला आहे जी आपल्या कर्तव्याऐवजी राजकीय समीकरणांचा विचार करते. बंगाली हिंसाचाराची ही लांबच लांब सावली जर वेळीच रोखली नाही, तर उद्या इतर राज्यांतही त्याचे लोण पसरायला वेळ लागणार नाही. आता चेंडू निवडणूक आयोगाच्या कोर्टात आहे. त्यांनी स्वतःला सावरून आपली निष्पक्षता कृतीतून सिद्ध करावी किंवा इतिहासाच्या पानांवर 'एक हतबल आणि लाचार संस्था' म्हणून आपली नोंद होण्याची तयारी ठेवावी. लोकशाहीत जनता हीच सर्वोच्च असते, पण जेव्हा लोकशाहीच्या संरक्षणाची जबाबदारी असलेली यंत्रणाच जनतेचा आवाज दाबण्यासाठी सत्तेच्या दावणीला बांधली जाते, तेव्हा न्यायालयाचा हस्तक्षेप हाच शेवटचा आशेचा किरण उरतो. बंगालमधील या रक्ताळलेल्या 'सावल्यां'मधून लोकशाहीचा सूर्य कधी मुक्त होणार, हाच खरा कळीचा प्रश्न आहे.

---

# पिंपरी-चिंचवड स्थायी समितीत विविध विकासकामांना मंजुरी

## स्वच्छता अभियान प्रभावीपणे राबविण्यासाठी आवश्यक खर्चाला मंजुरी

■ **दैनिक राज्य लोकतंत्र**

**पिंपरी** : पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या स्थायी समितीच्या सभेत शहरातील विविध विकासकामांना मंजुरी देण्यात आली. ही सभा सभापती अभिषेक बारणे यांच्या अध्यक्षतेखाली महापालिकेच्या मुख्य प्रशासकीय इमारतीतील दिवंगत महापौर मधूकर पवळे सभागृहात पार पडली.

सभेस स्थायी समिती सदस्यांसह अतिरिक्त आयुक्त तृप्ती सांडभोर, विक्रांत बगाडे, नगरसचिव मुकेश कोळप तसेच विविध विभागांचे अधिकारी उपस्थित होते. सभेत कचरा संकलन व वाहतूक वाहनांवर व्हीटीएम यंत्रणा बसविणे, त्यांची देखभाल व दुरुस्ती करण्यास मंजुरी देण्यात आली. जुनी सांगवी येथील रुग्णालयाच्या दुरुस्ती कामांनाही मान्यता देण्यात आली. स्वच्छता अभियान प्रभावीपणे राबविण्यासाठी आवश्यक खर्चालाही मंजुरी देण्यात आली.



पुणे-बंगळुरू महामार्गाच्या पश्चिमेकडील वाकड, पुनावळे, ताथवडे परिसरात पावसाळी पाण्याच्या लाईनची दुरुस्ती व नवीन लाईन टाकण्याच्या कामांना मंजुरी देण्यात आली. विविध प्रभागांमध्ये फुटपाथ, पेव्हिंग ब्लॉक दुरुस्ती, गटर व इतर स्थापत्य कामे हाती घेण्यास मान्यता देण्यात आली. औद्योगिक परिसरातील रस्त्यांचे हॉटमिक्स पद्धतीने डांबरीकरण करण्यासही मंजुरी देण्यात आली.

पाणीपुरवठा सुधारण्यासाठी ताथवडे, पुनावळे, किवळे व रावेत परिसरात नवीन जलवाहिन्या टाकणे, वॉल्व बसविणे तसेच संबंधित कामांना मंजुरी देण्यात आली.जीवननगर येथील पाण्याच्या टाकीवरून पाणीपुरवठ्यासाठी नवीन जलवाहिनी टाकण्याचाही निर्णय घेण्यात आला. झोपडपट्टी भागांमध्ये गटार, स्टॉर्म वॉटर लाईन व दुरुस्ती कामे करण्यास मान्यता देण्यात आली. तसेच विविध प्रभागांमध्ये जलनिस्सारण व्यवस्थेत सुधारणा करण्याचे निर्णय घेण्यात आले.

महापालिकेच्या ताळेबंदाचे लेखापरीक्षण करण्यासाठी सनदी लेखापाल नियुक्त करण्यास मंजुरी देण्यात आली. आकुर्डी येथील माध्यमिक विद्यालयातील एमएस-सीआयटी केंद्रासाठी फर्निचर खरेदीलाही मान्यता देण्यात आली. याशिवाय, पिंपरी येथे त्यागमूर्ती माता रमाई भीमराव आंबेडकर सृष्टीच्या भूमिपूजन कार्यक्रमासाठी लागणाऱ्या खर्चासही मंजुरी देण्यात आली.

शहराचा वेगाने होत असलेला विस्तार लक्षात घेऊन पायाभूत सुविधा सक्षम करण्यावर भर देण्यात येत असल्याचे सभापती अभिषेक बारणे यांनी सांगितले. स्वच्छता, पाणीपुरवठा, रस्ते, जलनिस्सारण, आरोग्य आणि शिक्षण या क्षेत्रांतील कामांना प्राधान्य देण्यात आल्याचे त्यांनी नमूद केले. विशेषतः पावसाळ्याच्या पार्श्वभूमीवर ड्रेनेज आणि स्टॉर्म वॉटर लाईनच्या कामांना गती देण्यावर भर असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

दरम्यान, एप्रिल २०२६ मध्ये सेवानिवृत्त होणाऱ्या कार्यकारी अभियंता सतिश वाघमारे आणि राजेंद्र मोराणकर यांचा सभेत सत्कार करण्यात आला. त्यांच्या सेवाकाळातील योगदानाबद्दल कृतज्ञता व्यक्त करण्यात आली.

---

# महाराष्ट्र दिनानिमित्त 'जाणता राजा' महानाट्य

■ **दैनिक राज्य लोकतंत्र**

**पिंपरी** : महाराष्ट्र दिन आणि मराठी राजभाषा दिनाच्या निमित्ताने पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या वतीने नागरिकांसाठी भव्य सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. निगडी सेक्टर २५ येथील मदनलाल धिंग्रा मैदानात दि. १ मे रोजी सायंकाळी ६.३० वाजता 'जाणता राजा' हे ऐतिहासिक महानाट्य सादर होणार आहे.

पद्मभूषण शिवशाहीर बाबासाहेब पुरंदरे लिखित आणि दिग्दर्शित 'जाणता राजा' हे महानाट्य आशिया खंडातील अग्रगण्य ऐतिहासिक नाट्यप्रयोगांपैकी एक मानले जाते. हा प्रयोग सर्व नागरिकांसाठी विनामूल्य खुला असून मोठ्या संख्येने उपस्थित राहण्याचे आवाहन महापौर रवि लांडगे यांनी केले आहे. या कार्यक्रमास केंद्रीय सहकार व नागरी विमान वाहतूक राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ, राज्याच्या उपमुख्यमंत्री तथा पुणे जिल्ह्याच्या पालकमंत्री सुनेत्रा पवार यांची प्रमुख उपस्थिती राहणार आहे.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महापौर रवि लांडगे असतील. याशिवाय अण्णा बनसोडे, सुप्रिया सुळे, श्रीरंग आप्पा बारणे, डॉ. अमोल कोल्हे, महेश लांडगे यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित राहणार आहेत. तसेच स्थानिक आमदार, नगरसेवक आणि महापालिकेचे अधिकारीही मोठ्या संख्येने उपस्थित राहतील.

---

# अतिक्रमणांवर महापालिकेची धडक कारवाई

■ **दैनिक राज्य लोकतंत्र**

**पिंपरी** : पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या 'ड' क्षेत्रीय कार्यालयाअंतर्गत जगताप डेअरी ते वाकड परिसरात रस्त्याच्या दोन्ही बाजूंना उभारण्यात आलेल्या अतिक्रमण व अनधिकृत बांधकामांवर महापालिकेने मोठी कारवाई केली. सकाळी १० वाजल्यापासून सुरू झालेल्या या मोहिमेत ६ हजार ९४५ चौ. मी. क्षेत्रातील अतिक्रमण हटविण्यात आले, तर ३३ पत्रा शेडवर निष्कासनाची कारवाई करण्यात आली.

या परिसरातील एकूण १०४ मालमत्तांची यादी प्रशासनाने तयार केली होती. न्यायालयीन स्थगिती किंवा अटींसह स्थगिती असलेल्या मालमत्ता वगळून उर्वरित सर्व अनधिकृत बांधकामांवर नियमानुसार कारवाई करण्यात आली.




आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी यांच्या आदेशानुसार आणि अतिरिक्त आयुक्त तृप्ती सांडभोर यांच्या मार्गदर्शनाखाली ही मोहीम राबविण्यात आली. ड क्षेत्रीय कार्यालयाच्या क्षेत्रीय अधिकारी अश्विनी गायकवाड यांच्या नेतृत्वात कारवाई पार पडली. यामध्ये अतिक्रमण विभागाचे अधिकारी, बांधकाम विभागाचे अभियंते तसेच क्षेत्रीय अधिकारी सहभागी झाले होते.

कारवाईदरम्यान सुमारे १५० अधिकारी व कर्मचारी, १०४ पोलीस कर्मचारी आणि महाराष्ट्र सुरक्षा बलाचे ६० जवान तैनात होते. अतिक्रमण हटविण्यासाठी १६ जेसीबींचा वापर करण्यात आला. आपत्कालीन परिस्थितीसाठी अग्निशमन दलाची एक गाडी आणि दोन ॲम्बुलन्स सज्ज ठेवण्यात आल्या होत्या.

शहरातील वाढत्या अनधिकृत बांधकामांवर नियंत्रण ठेवून नागरिकांना सुरक्षित आणि नियोजनबद्ध सुविधा देणे हा या मोहिमेचा उद्देश असल्याचे प्रशासनाने स्पष्ट केले. नियमांचे उल्लंघन करून उभारण्यात येणारी कोणतीही बांधकामे सहन केली जाणार नसून अशा प्रकरणांवर कठोर कारवाई केली जाईल, असा इशाराही देण्यात आला. पिंपरी-चिंचवड शहराचा शाश्वत विकास साधण्यासाठी अनधिकृत बांधकामांना आळा घालणे आवश्यक असल्याचे आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी यांनी सांगितले. कायद्याची अंमलबजावणी काटेकोरपणे केली जाईल आणि नागरिकांनी नियमांचे पालन करणे गरजेचे असल्याचे त्यांनी नमूद केले. संबंधित परिसरातील कारवाई पुढील दिवशीही सुरू राहणार असल्याचे प्रशासनाने स्पष्ट केले.

---

# जादूटोण्याच्या आमिषाने तरुणीची आत्महत्या, दोघांना अटक

■ **दैनिक राज्य लोकतंत्र**

**पुणे** : सोशल मीडियाच्या माध्यमातून जादूटोण्याच्या आमिषाने फसवणूक करत एका सुशिक्षित तरुणीला आत्महत्येस प्रवृत्त केल्याची धक्कादायक घटना उघडकीस आली आहे. या प्रकरणाचा तपास करत पौड पोलिसांनी राजस्थानमधील टोळीतील दोन आरोपींना अटक केली आहे.

किशन ईश्वरचंद लखारा (वय २२) आणि सुनील रामेश्वर भार्गव अशी अटक करण्यात आलेल्या आरोपींची नावे आहेत. मुळशी तालुक्यातील कोळवण येथील रेणुका लिखिते (वय २५) ही एम.ए. शिक्षण घेणारी विद्यार्थिनी होती. ती चिन्मय विभूती आश्रमातील महिला वसतिगृहात वास्तव्यास होती.




पोलिसांच्या माहितीनुसार, सोशल मीडियावरून संपर्कात आलेल्या व्यक्तींनी प्रेम परत मिळवून देतो, असे आमिष दाखवत तिची फसवणूक केली. आरोपींनी जादूटोण्याच्या नावाखाली तिला विविध विधी करण्यास भाग पाडले आणि वेळोवेळी सुमारे ७४ हजार रुपये ऑनलाइन उकळले. तसेच कुटुंबीयांबाबत अनिष्ट घडेल, अशा धमक्या देत तिच्यावर मानसिक दबाव टाकण्यात आला.

सततच्या छळाला कंटाळून संबंधित तरुणीने गळफास घेऊन आत्महत्या केल्याचे समोर आले आहे. घटनेनंतर पौड पोलिसांनी तातडीने तपास सुरू केला. तांत्रिक विश्लेषण, बँक व्यवहार आणि मोबाईल लोकेशनच्या आधारे आरोपी राजस्थानमधील असल्याचे निष्पन्न झाले.

पोलिसांचे पथक बीकानेर जिल्ह्यातील नोखा येथे रवाना होऊन स्थानिक पोलिसांच्या मदतीने दोघांना अटक करण्यात आली. त्यांना पुण्यात आणल्यानंतर न्यायालयाने २ मे २०२६ पर्यंत पोलीस कोठडी सुनावली आहे.

या प्रकरणी भारतीय न्याय संहिता, महाराष्ट्र जादूटोणा विरोधी कायदा २०१३ आणि माहिती तंत्रज्ञान कायद्यानुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे. आणखी आरोपींचा शोध सुरू असून पुढील तपास सुरू आहे.

### लोणीकंद पोलिसांची ड्रग्जविरोधी कारवाई

**पुणे :** अंमली पदार्थांविरोधातील मोहिमेत लोणीकंद पोलिसांनी मोठी कारवाई करत मॅफेड्रॉन (एमडी) ड्रग्ज विक्री करणाऱ्या टोळीचा पर्दाफाश केला. सलग धडक कारवायांत सहा आरोपींना अटक करण्यात आली असून सुमारे ३५ लाख रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

अटक करण्यात आलेल्यांमध्ये पुंजाजी जयचंद्र चौधरी (वय ४०), राजेंद्र केरु टेळे (वय ३५), करण सचिन मोहिते (वय २१), भागीरथसिंग सज्जनसिंग राजपुरोहित (वय २८), आदिनाथ दशरथ शिर्के (वय २९) आणि योगेश लक्ष्मण चव्हाण (वय ३७) यांचा समावेश आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, १९ एप्रिल रोजी कटकेवाडी फाटा येथे पहिली कारवाई करत पुंजाजी चौधरी याला ताब्यात घेण्यात आले. त्याच्याकडून २१.८६० ग्रॅम एमडी पावडर आणि आयफोनसह सुमारे ४.८७ लाखांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. त्यानंतर २० एप्रिल रोजी पेरणे फाटा येथे राजेंद्र टेळे आणि करण मोहिते यांना अटक करत सुमारे १४.१० लाखांचा माल जप्त करण्यात आला.

पुढील तपासात २२ एप्रिल रोजी मांजरी परिसरातून आणखी दोघांना अटक करण्यात आली. त्यांच्याकडून एमडी पावडर, कार, मोबाईल आणि रोख रक्कम असा ८.३४ लाखांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. २३ एप्रिल रोजी योगेश चव्हाण याला ताब्यात घेत त्याच्याकडून १४.५० लाखांचा एमडी साठा हस्तगत करण्यात आला.

या कारवायांमध्ये एकूण १७४.९५ ग्रॅम मॅफेड्रॉन जप्त करण्यात आले असून एकूण मुद्देमालाची किंमत ३४ लाख ९८ हजार ८०० रुपये इतकी आहे. अटक आरोपींना न्यायालयीन कोठडी सुनावण्यात आली असून त्यांना येरवडा कारागृहात ठेवण्यात आले आहे. या कारवाईमुळे पुणे ग्रामीण भागातील ड्रग्ज जाळ्यावर मोठा आघात झाल्याचे पोलिसांनी सांगितले. आणखी आरोपींचा शोध सुरू असून नागरिकांनी संशयास्पद हालचालींची माहिती तातडीने पोलिसांना द्यावी, असे आवाहन करण्यात आले आहे.

---

# गृहनिर्माण संस्थांच्या समस्या झाल्या तीव्र

■ **दैनिक राज्य लोकतंत्र**

**पिंपरी** : पिंपरी-चिंचवड शहरातील झपाट्याने वाढणाऱ्या नागरीकरणामुळे गृहनिर्माण संस्थांसमोरील अडचणी गंभीर होत चालल्या आहेत. चिखली, मोशी, चऱ्होली, वाकड आणि पिंपळे सौदागर परिसरातील सोसायटीधारकांना मूलभूत सुविधा, कचरा व्यवस्थापन आणि प्रशासकीय प्रक्रियांशी संबंधित समस्यांना तोंड द्यावे लागत आहे.

पालिकेकडून युजर फी आकारली जात असतानाही कचरा व्यवस्थापनाची जबाबदारी सोसायट्यांवर टाकली जात असल्याची तक्रार नागरिकांकडून होत आहे. कचरा वर्गीकरण आणि विल्हेवाटीसाठी स्वतंत्र व्यवस्था उभारावी लागत असल्याने सोसायटींवर दुहेरी आर्थिक बोजा पडत आहे. कर भरूनही अपेक्षित सेवा मिळत नसल्याने नाराजी वाढत आहे. गृहनिर्माण संस्थांसाठी डिम्ड कन्व्हेअन्स प्रक्रिया हा आणखी एक गुंतागुंतीचा विषय ठरत आहे. अनेक बांधकाम व्यावसायिक अभिहस्तांतरणासाठी पुढे येत नसल्याने सोसायट्यांना कायदेशीर मार्गाचा अवलंब करावा लागत आहे. या सर्व समस्यांमुळे सोसायटीधारकांचा संताप वाढत असून प्रशासनाकडून दुर्लक्ष होत असल्याची भावना व्यक्त केली जात आहे. शासनाने तातडीने हस्तक्षेप करून या प्रश्नांवर ठोस उपाययोजना कराव्यात, अशी मागणी होत आहे.

**दैनिक राज्य लोकतंत्र** हे पत्र मुद्रक, प्रकाशक मालक सीमा भिमराव मस्के यांनी जगमित्र प्रिंटर्स ॲण्ड सेल्स कॉर्पोरेशन सुमतीनगर, जालना रोड, बीड येथे छापून कार्यालय दैनिक राज्य लोकतंत्र, राजीव गांधी चौक, कॅनाल रोड, बीड, ता.जि. बीड, ४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. **संपादक** - सीमा मस्के (मोकाशे) । **कार्यकारी संपादक** - सुभाष विलासराव चौरे या अंकात प्रकाशित झालेल्या मजकुरातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. न्यायालयीन वाद बीड न्यायकक्षेत. EMAIL- RAJYALOKTANTRA@GMAIL.COM NO.L SB/BEED RNP-206/2024-26

## सारांश वृत्त

### मे अखेर मेट्रो ३चा पहिला टप्पा सुरू

**पिंपरी** : हिंजवडी आयटी पार्क परिसरातील वाहतूक कोंडी कमी करण्यासाठी उभारण्यात येत असलेल्या पुणे मेट्रो ३ प्रकल्पाचा पहिला टप्पा मे २०२६ अखेर सुरू होण्याची शक्यता आहे. काही स्थानके प्रवाशांसाठी खुली करण्याच्या दृष्टीने पीएमआरडीए प्रशासनाने कामाचा आढावा घेतला असून प्रकल्पाला गती आल्याची माहिती मुख्य अभियंता रिनाज पठाण यांनी दिली. पहिल्या टप्प्यात कार डेपो ते स्थानक क्रमांक १२ दरम्यान मेट्रो सेवा सुरू करण्याचे उद्दिष्ट आहे. यासाठीची कामे अंतिम टप्प्यात असून पूर्ण झालेली स्थानके टप्प्याटप्याने प्रवाशांसाठी खुली केली जाणार आहेत. मुख्य अभियंता पठाण यांनी स्थानक क्रमांक ९ ला भेट देऊन प्रत्यक्ष पाहणी केली. कामाचा दर्जा आणि नियोजित कालमर्यादा पाळण्याबाबत त्यांनी संबंधित कंत्राटदारांना सूचना दिल्या. प्रकल्प वेळेत पूर्ण करण्यासाठी कंत्राटदारांना पत्रही देण्यात आले आहे.

### आयुष्मान कार्ड नाकारल्यास कारवाई

**पुणे** : आयुष्मान भारत-महात्मा फुले योजनेचा लाभ घेताना नागरिकांना बऱ्याच अडचणींचा सामना करावा लागतो. कधी कागदपत्रांची कमतरता, तर कधी कार्ड असूनही कॅशलेस उपचार नाकारले जातात. त्यामुळे आयुष्मान भारत योजनेत समाविष्ट असलेल्या रुग्णालयांनी कार्ड नाकारल्यास संबंधित रुग्णालयांवर कारवाई केली जाणार असल्याचे आरोग्य विभागातर्फे स्पष्ट करण्यात आले आहे. आयुष्मान भारत आणि महात्मा फुले योजनेचा एकत्रित लाभ मिळावा, यासाठी उत्पन्नाची अट शिथिल केली आहे. त्याचप्रमाणे उपचारांची प्रक्रिया सुलभ व्हावी, यासाठी आयुष्मान भारत कार्डवर भर दिला जात आहे. लाभार्थ्यांना समाविष्ट रुग्णालयांत 'आरोग्य मित्र' काऊंटरवर आवश्यक मार्गदर्शन मिळावे, यासाठी संबंधित अधिकाऱ्यांचे संपर्क क्रमांक उपलब्ध करून दिले आहेत. उपचार प्रक्रियेत अडचणी आल्यास लाभार्थ्यांनी या क्रमांकांवर संपर्क साधावा, असे आवाहन केले आहे.

### नव्या धोरणामुळे महिलांच्या अडचणींमध्ये वाढ

# ग्रामीण भागात 30 दिवसांत सिलिंडर द्या

■ दैनिक राज्य लोकतंत्र



**मंचर** : ग्रामीण भागात घरगुती गॅस सिलेंडर मिळण्यास होत असलेल्या विलंबामुळे नागरिक, विशेषतः महिलांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत आहे. सध्या ग्रामीण भागात ४५ दिवसांनी भरलेली गॅस सिलेंडर टाकी मिळत असल्याने हा कालावधी कमी करून शहरी भागाप्रमाणे ३० दिवसांनी सिलेंडर उपलब्ध करून द्यावेत, अशी ठाम मागणी पंचायत समिती सदस्य अंकिता अनिल वाळुंज यांनी केली आहे.

आंतरराष्ट्रीय स्तरावरील घडामोडींमुळे गॅस पुरवठ्यावर परिणाम झाल्याचे कारण देत गॅस कंपन्यांनी वितरणाचे नवे धोरण लागू केले आहे. त्यानुसार शहरी भागात २५ ते ३० दिवसांनी, तर ग्रामीण भागात ४५ दिवसांनी घरगुती गॅस सिलेंडर देण्यात येत आहेत. मात्र या धोरणामुळे ग्रामीण भागातील कुटुंबांना स्वयंपाकासाठी मोठ्या अडचणी निर्माण झाल्या आहेत.

आंबेगाव तालुक्यातील पेठ पारगाव येथील भारत गॅस एजन्सी, निरगुडसर येथील इंडियन गॅस एजन्सी आणि कळंब येथील एचपी गॅस एजन्सी या ग्रामीण भागातील प्रमुख वितरक आहेत. या तिन्ही एजन्सींमार्फत ग्राहकांना ४५ दिवसांच्या अंतराने सिलेंडर पुरवठा केला जात आहे. त्याउलट घोडेगाव आणि नारायणगाव येथील शहरी भागात ३० दिवसांनी सिलेंडर मिळत असल्याने ग्रामीण भागातील नागरिकांमध्ये भेदभावाची भावना निर्माण झाली आहे.

पूर्वी ग्रामीण भागात चुली व सरपणाच्या माध्यमातून स्वयंपाक केला जात होता. मात्र बदलत्या जीवनशैलीमुळे आणि पक्क्या घरांच्या वाढत्या प्रमाणामुळे आता बहुतांश कुटुंबे गॅसवर अवलंबून आहेत. वन विभागाकडून झाडतोडीवर निर्बंध असल्याने सरपण सहज उपलब्ध होत नाही. तसेच शासनाने रॉकेल पुरवठ्याबाबत घोषणा केली असली तरी त्याची प्रभावी अंमलबजावणी झालेली नाही. या सर्व कारणांमुळे गॅस सिलेंडरच एकमेव पर्याय राहिला असून तोही उशिरा मिळत असल्याने नागरिकांची गैरसोय वाढली आहे.

गृहिणींना रोजच्या स्वयंपाकासाठी मोठी कसरत करावी लागत असून काही ठिकाणी पर्याय म्हणून शेजारी किंवा नातेवाईकांकडून सिलेंडर घेण्याची वेळ येत आहे. अनेक महिलांनी याबाबत तीव्र नाराजी व्यक्त केली असून परिस्थिती कायम राहिल्यास आंदोलनाचा इशाराही देण्यात आला आहे. या पार्श्वभूमीवर पंचायत समिती सदस्य अंकिता वाळुंज यांनी गॅस कंपन्यांनी ग्रामीण व शहरी असा भेदभाव न करता सर्व ग्राहकांना ३० दिवसांनी सिलेंडर उपलब्ध करून द्यावेत, अशी मागणी केली आहे. अन्यथा महिलांना रस्त्यावर उतरावे लागेल, असा इशाराही त्यांनी दिला आहे.

दरम्यान, आंबेगावचे तहसीलदार डॉ. सचिन वाघ यांनी सांगितले की, ग्रामीण भागातील महिलांकडून २५ ते ३० दिवसांत सिलेंडर मिळण्याची मागणी सातत्याने होत आहे. याबाबत जिल्हा पुरवठा अधिकाऱ्यांशी पत्रव्यवहार करण्यात आला असून लवकरच पुरवठा सुरळीत करण्यासाठी प्रयत्न सुरू आहेत.

एचपी गॅस डीलर बाळशीराम भालेराव यांनीही ग्रामीण भागातील ग्राहकांच्या अडचणी लक्षात घेऊन वरिष्ठांकडे ३० दिवसांत सिलेंडर पुरवठा करण्याबाबत मागणी केल्याचे स्पष्ट केले. सध्या ४५ दिवसांच्या अंतरामुळे महिलांचा रोष वाढत असून परिस्थिती सुधारण्याची गरज असल्याचे त्यांनी नमूद केले.

## भामा आसखेड धरणामधून १००० क्युसेकने विसर्ग



■ दैनिक राज्य लोकतंत्र

**राजगुरुनगर** : खेड तालुक्यातील शेतकऱ्यांना दिलासा देणारा निर्णय घेत भामा आसखेड धरणातून शेतीसाठी पाणी सोडण्यात आले आहे. बुधवारी दि. २९ एप्रिल रोजी सकाळी ९.१५ वाजता धरणातून १००० क्युसेक वेगाने पाण्याचा विसर्ग सुरू करण्यात आला.

उन्हाळ्याच्या पार्श्वभूमीवर पिकांना पाण्याची तीव्र गरज निर्माण झाली होती. अनेक ठिकाणी पाण्याअभावी शेतकरी अडचणीत आले होते. ही स्थिती लक्षात घेऊन आमदार बाबाजी काळे यांनी प्रशासनाकडे पाठपुरावा करून धरणातून पाणी सोडण्याची मागणी केली होती. प्रशासनाने या मागणीची दखल घेत तातडीने निर्णय घेतला. त्यामुळे परिसरातील शेतीला मोठा दिलासा मिळणार असून उभ्या पिकांना जीवनदान मिळण्यास मदत होणार आहे.

शेतकऱ्यांच्या प्रश्नांसाठी सातत्याने पाठपुरावा सुरू ठेवणार असल्याचे आमदार बाबाजी काळे यांनी स्पष्ट केले.

## चास-कडेवाडीत दोन घरफोड्या; साडेपाच लाखांचा ऐवज लंपास

■ दैनिक राज्य लोकतंत्र



**मंचर** : आंबेगाव तालुक्यातील चास-कडेवाडी येथे मंगळवारी रात्री अज्ञात चोरट्यांनी दोन घरफोड्या करत सुमारे पाच लाख ५८ हजार रुपयांचा ऐवज लंपास केला. या प्रकरणी घोडेगाव पोलिसांनी अज्ञात आरोपींविरोधात गुन्हा दाखल केला आहे.

चोरट्यांनी बबन वाळूंज यांच्या घराजवळील पडवीची कौले काढून घरात प्रवेश केला. घरातील कपाट उचकटून दीड लाख रुपये किमतीचे मंगळसूत्र, एक लाख रुपये किमतीची सोन्याची बोरमाळ, २५ हजार रुपये किमतीची सोन्याची नथ आणि आठ हजार रुपये रोख रक्कम चोरून नेली. रात्री सुमारे अडीच वाजण्याच्या सुमारास ही घटना उघडकीस आली. त्यानंतर वाळूंज दांपत्याने परिसरात शोध घेतला, मात्र चोरटे पसार झाले होते.

याच परिसरातील संतोष मारुती वाळूंज यांच्या घरातही चोरी झाली. चोरट्यांनी टेरेसवरील जिन्याचा दरवाजा उघडून घरात प्रवेश करत बेडरूममधील कपाट फोडले. त्यातून दीड लाख रुपये किमतीचे मंगळसूत्र, ७५ हजार रुपये किमतीच्या कानातील कुड्या, दीड तोळे वजनाचे वेल आणि ५० हजार रुपये किमतीच्या दोन अंगठ्या असा ऐवज चोरून नेला.


घटनेची माहिती मिळताच उपविभागीय अधिकारी अमोल मांढवे आणि सहाय्यक पोलीस निरीक्षक सागर पवार यांनी घटनास्थळी भेट देऊन पाहणी केली.

श्वान पथक आणि ठसे तज्ज्ञांनाही पाचारण करण्यात आले. पुढील तपास घोडेगाव पोलीस करत आहेत.

## पुल दुरुस्ती व साकवांसाठी निधी मंजूर

### आमदार बाबाजी काळे यांच्या पाठपुराव्याला यश

■ दैनिक राज्य लोकतंत्र



**राजगुरुनगर** : खेड तालुक्यातील पायाभूत सुविधांच्या बळकटीकरणासाठी विविध पुलांच्या दुरुस्ती आणि साकव बांधकामांसाठी निधी मंजूर झाला आहे. आमदार बाबाजी काळे यांच्या पाठपुराव्यामुळे सार्वजनिक बांधकाम विभागामार्फत ही कामे लवकरच मार्गी लागणार आहेत.

तालुक्यातील पाच पुलांच्या दुरुस्तीसाठी एकूण सुमारे ३ कोटी रुपयांचा निधी मंजूर करण्यात आला आहे. वांद्रे-आंबोली-पाईट-शिरोली मार्गावरील पापळवाडी येथील पुलासाठी ४० लाख १५ हजार रुपये, निघोजे-चिंबळी-आळंदी-धानोरे मार्गावरील निघोजे पुलासाठी ४१ लाख १३ हजार रुपये मंजूर झाले आहेत. धामणे-आसखेड-कुरकुंडी-कोरेगाव-चांदूस-पिंपरी-वाकी-काळूस-भोसे मार्गावरील काळूस येथील पुलासाठी ९९ लाख ९७ हजार रुपयांचा निधी मिळाला आहे. तसेच कोये गावाजवळील पुलासाठी २९ लाख ६२ हजार रुपये आणि चांदूस येथील लहान पुलाच्या बांधकामासाठी ९१ लाख ३९ हजार रुपये मंजूर करण्यात आले आहेत. याशिवाय, गोसासी येथील समाजमंदिराकडे जाणाऱ्या रस्त्यावर साकव बांधण्यासाठी १ कोटी रुपये, तर वाफगाव येथील माघाडे वस्ती, बौद्धवस्ती आणि नेटकेवस्तीला जोडणाऱ्या रस्त्यासाठी ६० लाख रुपयांचा निधी मंजूर झाला आहे.

या कामांमुळे ग्रामीण भागातील वाहतूक अधिक सुरक्षित व सुकर होण्यास मदत होणार आहे. आमदार बाबाजी काळे यांच्या सातत्यपूर्ण पाठपुराव्यामुळे तालुक्यातील विकासकामांना गती मिळत असल्याची भावना नागरिकांकडून व्यक्त करण्यात येत आहे.

## आठवडे बाजारात ग्राहकांचा शुकशुकाट



■ दैनिक राज्य लोकतंत्र

**लोणी-धामणी** : आंबेगाव तालुक्यात वाढलेल्या उष्णतेचा फटका लोणी येथील आठवडे बाजाराला बसला असून बुधवारी बाजारात ग्राहकांची मोठ्या प्रमाणात अनुपस्थिती दिसून आली. परिणामी व्यापाऱ्यांना ग्राहकांची वाट पाहत बसावे लागल्याचे चित्र होते.

आंबेगाव तालुक्याच्या पूर्व भागातील लोणी येथील आठवडे बाजार हा परिसरातील मोठा बाजार मानला जातो. आंबेगाव, खेड आणि शिरूर तालुक्यातील सुमारे ३५ ते ४० गावांचा या बाजाराशी संपर्क आहे. मात्र, सध्या वाढलेल्या तापमानामुळे ग्राहकांनी बाजाराकडे पाठ फिरवल्याने वर्दळ लक्षणीय घटली आहे.

या भागात सध्या कमाल तापमान ३५ ते ४० अंश सेल्सिअसदरम्यान पोहोचले असून उन्हाची तीव्रता वाढली आहे. यंदा हिवाळा कमी जाणवल्यानंतर उन्हाळ्याची सुरुवात लवकर झाली. फेब्रुवारीपासूनच तापमान ३५ अंशांपर्यंत गेले होते, तर मार्चपासून उष्णतेत अधिक वाढ झाली आहे. गेल्या काही दिवसांत दुपारच्या वेळी उन्हाच्या तीव्र झळा बसत असून नागरिकांनी बाहेर पडणे टाळले आहे. त्यामुळे ग्रामीण भागातील रस्तेही ओस पडल्याचे दिसून येत आहे. बाजारातील ग्राहकसंख्या घटल्याने व्यापाऱ्यांचे नुकसान होत असून, उष्णतेमुळे शीतपेयांच्या मागणीत मात्र वाढ झाली आहे.

## गुणवत्ता संवर्धन अभियानात न्यू इंग्लिश स्कूल प्रथम

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**भवानीनगर** : पुणे जिल्ह्यात राबविण्यात आलेल्या शैक्षणिक गुणवत्ता संवर्धन अभियानात इंदापूर तालुक्यातील ग्रामविद्या विकास प्रतिष्ठानच्या न्यू इंग्लिश स्कूल, लाकडी या शाळेने इयत्ता आठवी ते दहावी गटात प्रथम क्रमांक पटकावला आहे.

पुणे जिल्हा परिषद व माध्यमिक विभागाचे शिक्षणाधिकारी डॉ. भाऊसाहेब कारेकर यांच्या नेतृत्वाखाली तसेच पुणे जिल्हा मुख्याध्यापक संघाच्या संयुक्त विद्यमाने हे अभियान राबविण्यात आले. या उपक्रमात इंदापूर तालुक्यातील सर्व शाळांनी सहभाग घेतला होता.

विद्यार्थ्यांची शैक्षणिक प्रगती, अध्यापन पद्धती, विविध उपक्रमांची अंमलबजावणी आणि शैक्षणिक वातावरण या निकषांवर शाळांचे मूल्यांकन करण्यात आले. या सर्व घटकांमध्ये न्यू इंग्लिश स्कूल, लाकडी या शाळेने उत्कृष्ट कामगिरी करत प्रथम क्रमांक मिळवला. या यशामागे संस्थेचे अध्यक्ष आप्पासाहेब ढोले, सर्व संचालक यांचे मार्गदर्शन, मुख्याध्यापक बापूराव ढोले, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचे समर्पित प्रयत्न आणि विद्यार्थ्यांची मेहनत कारणीभूत ठरली. तसेच पालकांचे सहकार्यही महत्त्वाचे ठरले आहे.

या यशामुळे विद्यालयात उत्साहाचे वातावरण निर्माण झाले असून, भविष्यातही अशीच उत्कृष्ट कामगिरी करण्याचा संकल्प व्यक्त करण्यात आला आहे. नुकतेच पुणे येथे शिक्षणाधिकारी डॉ. भाऊसाहेब कारेकर यांच्या हस्ते विद्यालयाला पुरस्कार देऊन गौरविण्यात आले.

## पिंपळवंडीच्या विद्यार्थ्यांची चमकदार कामगिरी

■ दैनिक राज्य लोकतंत्र




**पिंपळवंडी** : शिर्डी येथे पार पडलेल्या चौदावी पामा इंडिया अबॅकस आणि मेंटल अरिदमॅटिक राष्ट्रीय स्पर्धा २०२६ मध्ये जुन्नर तालुक्यातील पिंपळवंडी येथील जिल्हा परिषद शाळेच्या विद्यार्थ्यांनी उल्लेखनीय यश मिळवले. देशभरातील सुमारे १५०० विद्यार्थ्यांच्या सहभागात ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांनी पहिल्याच प्रयत्नात आपली गुणवत्ता सिद्ध केली.

या स्पर्धेत रीदा इम्रान तांबोळी हिने चॅम्पियन ऑफ चॅम्पियन हा किताब पटकावला. अद्विता पंकज भोर आणि अख्तर इम्रान तांबोळी यांनी चॅम्पियन पद मिळवले. द्वितीय क्रमांक काव्या सुहास कसबे, रितू प्रदीप वामन आणि रुद्रांश सुनील रायकर यांनी मिळवला, तर तृतीय क्रमांक रुषिका आशीष वामन आणि विधी मंगेश मंडलीक यांनी पटकावला. पिंपळवंडी जिल्हा परिषद शाळेत पामा इंडिया संस्थेच्या माध्यमातून सुरू असलेल्या अबॅकस प्रशिक्षण उपक्रमाचा या यशामागे मोठा वाटा असल्याचे सांगितले जात आहे. विद्यार्थ्यांना योग्य प्रशिक्षण व मार्गदर्शन मिळाल्याने त्यांनी राष्ट्रीय स्तरावर चमकदार कामगिरी केली.

या यशाबद्दल विद्यार्थ्यांचे अक्षरशिल्प पामा इंडिया संस्थेसह मार्गदर्शक शिक्षिका श्वेता दांगट, जया गोरडे, मनीषा भुजबळ, माणिक बोऱ्हाडे, श्रीकांत भालेराव तसेच ग्रामस्थांच्या वतीने अभिनंदन करण्यात आले. योग्य मार्गदर्शन आणि संधी मिळाल्यास ग्रामीण भागातील विद्यार्थीही राष्ट्रीय स्तरावर उल्लेखनीय कामगिरी करू शकतात, हे पिंपळवंडीच्या विद्यार्थ्यांनी आपल्या यशातून अधोरेखित केले आहे.

### कर्मचाऱ्यांच्या कमतरतेमुळे ग्राहक त्रस्त

# ऐन उन्हाळयात अवसरी परिसरात वीज खंडित

■ दैनिक राज्य लोकतंत्र



**मंचर** : आंबेगाव तालुक्याच्या पूर्व भागातील अवसरी खुर्द, अवसरी बुद्रुक, टाव्हरेवाडी आणि गावडेवाडी या गावांमध्ये महावितरण कंपनीच्या अपुऱ्या मनुष्यबळामुळे वीजपुरवठ्याच्या समस्या गंभीर बनल्या आहेत. विशेषतः रात्रीच्या वेळी वारंवार वीज खंडित होत असल्याने नागरिकांना मोठा मनस्ताप सहन करावा लागत आहे.

या चार गावांसाठी टाव्हरेवाडी आणि गावठाण फीडर योजना राबविण्यात आली असली तरी वायरमनची अपुरी संख्या ही मुख्य समस्या ठरत आहे. याशिवाय स्थानिक पातळीवरील अधिकाऱ्यांमध्ये समन्वयाचा अभाव असल्याने त्याचा फटका थेट ग्राहकांना बसत असल्याची माहिती ग्रामपंचायत सदस्य कल्याण हिंगे पाटील यांनी दिली.

अवसरी खुर्द येथील महावितरण कार्यालयाच्या कार्यक्षेत्रात ही चार गावे येतात. येथे एकूण १० कर्मचारी कार्यरत असून त्यापैकी चार जण वसुली कामासाठी, तर पाच जण देखभाल दुरुस्ती कामासाठी नियुक्त आहेत. मात्र रात्रीच्या वेळी वायरमन मुक्कामी राहत नसल्याने वीजपुरवठा खंडित झाल्यास तातडीने दुरुस्ती होत नाही.

अवसरी खुर्द आणि अवसरी बुद्रुक ही दोन्ही गावे लोकसंख्येच्या दृष्टीने मोठी असून अवसरी खुर्द येथे शासकीय तंत्रनिकेतन अभियांत्रिकी महाविद्यालय असल्यामुळे विद्यार्थ्यांची वर्दळही मोठ्या प्रमाणात आहे. अशा परिस्थितीत वीजपुरवठा खंडित झाल्यास विद्यार्थ्यांसह नागरिकांना अडचणींचा सामना करावा लागतो. रविवार दि. २६ एप्रिल रोजी सायंकाळी ७ वाजता वीजपुरवठा खंडित झाला होता. याबाबत स्थानिकांनी महावितरणच्या अधिकाऱ्यांशी संपर्क साधला असता वायरमन बाहेर असल्याचे सांगण्यात आले. बराच वेळ प्रतीक्षा करूनही दुरुस्ती न झाल्याने अखेर रात्री साडेअकरा वाजता वीजपुरवठा सुरळीत करण्यात आला.

या पार्श्वभूमीवर अवसरी खुर्दसाठी किमान पाच, अवसरी बुद्रुकसाठी तीन आणि टाव्हरेवाडी व गावडेवाडी येथे प्रत्येकी दोन वायरमन नियुक्त करावेत, तसेच त्यांच्यावर वसुलीची जबाबदारी न देता स्वतंत्र यंत्रणा उभारावी, अशी मागणी माजी ग्रामपंचायत सदस्य राजू राठोड यांनी केली आहे.

## मानव-वन्यजीव संघर्ष कमी करण्यासाठी कार्यशाळा

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**डिंभे** : आंबेगाव तालुक्यातील घोडेगाव वनपरीक्षेत्रात बिबट तसेच अन्य वन्यप्राणी आणि मानव यांच्यातील संघर्ष कमी करण्यासाठी जनजागृती कार्यशाळा आयोजित करण्यात आली. ही कार्यशाळा वनसंरक्षक पुणे आशिष ठाकरे यांच्या संकल्पनेतून आणि उपवनसंरक्षक जुन्नर प्रशांत खाडे यांच्या पुढाकाराने पार पडली. सहाय्यक वनसंरक्षक अमृत शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले.

कार्यशाळेत वन्यजीव अभ्यासक नवनाथ फलके, वन्यजीव तज्ज्ञ सुशील सहारे आणि सौमित्र तिजारे यांनी ग्रामस्थांना मार्गदर्शन केले. बिबट किंवा अन्य वन्यप्राणी समोर आल्यास घ्यावयाच्या काळजीबाबत वनपरीक्षेत्र अधिकारी कुणाल लिमकर यांनी माहिती दिली.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी मुरलीधर असवले होते. उपसरपंच शुभांगी काळे यांनी मानव आणि जंगल यांच्यातील नात्याचा अनुभव सांगत ते अधिक सुदृढ ठेवण्याचे महत्त्व अधोरेखित केले. या वेळी पोलीस पाटील सुनील डामसे, सामाजिक कार्यकर्त्या प्रतिभा भगत, वनपाल गुलाब इथापे, प्रवीणकुमार लांघी आदी मान्यवर उपस्थित होते. वन्यजीव अभ्यासक नवनाथ फलके यांनी मानव-वन्यजीव सहजीवनाचे महत्त्व पटवून दिले.

## सारांश वृत्त

### हज भाडेवाढ मागे घेण्याची मागणी

**हैदराबाद:** एआयएमआयएमचे प्रमुख असदुद्दीन ओवैसी यांनी केंद्र सरकारला आवाहन केले की, पश्चिम आशियातील संघर्षामुळे यात्रेकरूंवर १०० अमेरिकी डॉलरचा अतिरिक्त अधिभार अनिवार्य करणारे भारतीय हज समितीने जारी केलेले परिपत्रक रद्द करावे. मुंबई एम्बार्केशन पॉईंटवरून निघणाऱ्या प्रत्येक यात्रेकरूकडून ९०,८४४ रुपये वसूल केले जात असूनही १०० अमेरिकन डॉलरची केलेली दरवाढ सध्याच्या दराच्या "जवळजवळ दुप्पट" आहे, असा आरोप त्यांनी केला.

### वंदे भारतचे 'गेम चेंजर' म्हणून कौतुक

**जम्मू :** जम्मू आणि काश्मीरमधील लोकांनी गुरुवारी जम्मू आणि श्रीनगर दरम्यान सुरू झालेल्या थेट वंदे भारत एक्सप्रेस सेवेचे स्वागत केले. सुधारित कनेक्टिव्हिटी, पर्यटन आणि आर्थिक विकासाच्या दिशेने हे एक मोठे पाऊल असल्याचे त्यांनी म्हटले आहे. प्रवाशांनी आणि हितधारकांनी या घडामोडीला “गेम चेंजर” म्हटले असून, या सेवेमुळे प्रवासाचा वेळ लक्षणीयरीत्या कमी होईल, खर्च वाचेल आणि व्हॅलीला सर्व-हवामानात कनेक्टिव्हिटी मिळेल, असे अधोरेखित केले आहे. जम्मू आणि काश्मीरच्या लोकांसाठी हा एक क्रांतीकारक बदल आहे. सर्व ऋतूंमध्ये कनेक्टिव्हिटी सुनिश्चित होईल.

### शिक्षकाला ३.६६ लाखांना लुटले

**जयपूर :** अजमेरमध्ये सायबर फसवणूक करणाऱ्यांनी एका शालेय शिक्षिकेला ४८ लाख रुपयांना ५ रुपयांची दुर्मिळ नोट विकत घेण्याचे खोटे ऑनलाइन आमिष दाखवून ३.६६ लाख रुपयांना फसवले, अशी माहिती पोलिसांनी दिली. उपअधीक्षक यांनी सांगितले की, पीडित महिला, जी खासगी शाळेतील शिक्षिका आहे, तिला फेसबुकवर एक जाहिरात आढळली, ज्यात असा दावा केला होता की ट्रॅक्टरचे चिन्ह असलेल्या ५ रुपयांच्या नोटेला चांगली किंमत मिळू शकते. तिने जाहिरातीत दिलेल्या क्रमांकावरून फसवणूक करणाऱ्यांशी संपर्क साधला असता, फसवणूक झाली.

## विमान भाडेवाढीवर नियंत्रणासाठी याचिका

# केंद्राला सर्वोच्च न्यायालयाची फटकार

■ दैनिक राज्य लोकतंत्र



**नवी दिल्ली :** खासगी विमान कंपन्यांकडून आकारल्या जाणाऱ्या विमान भाड्यांतील आणि अनुषंगिक शुल्कांतील अनपेक्षित चढउतारांवर नियंत्रण ठेवण्याच्या मागणीसंदर्भातील याचिकेवर प्रतिज्ञापत्र दाखल करण्यात झालेल्या विलंबाबद्दल सर्वोच्च न्यायालयाने गुरुवारी केंद्र सरकारला कडक शब्दांत फटकारले. न्यायमूर्ती विक्रम नाथ आणि न्यायमूर्ती संदीप मेहता यांच्या खंडपीठाने केंद्राला विलंबाचे ठोस कारण स्पष्ट करण्याचे निर्देश देत, एका आठवड्यात प्रतिज्ञापत्र सादर करण्याचे आदेश दिले.

सामाजिक कार्यकर्ते एस. लक्ष्मीनारायणन यांनी दाखल केलेल्या याचिकेत नागरी विमान वाहतूक क्षेत्रात पारदर्शकता आणण्यासाठी तसेच प्रवाशांचे हितसुरक्षण करण्यासाठी स्वतंत्र व सक्षम नियामक संस्था स्थापन करण्याची मागणी करण्यात आली आहे. सुनावणीदरम्यान याचिकाकर्त्यांच्या वकिलांनी केंद्राने अद्याप उत्तर दाखल केले नसल्याचे न्यायालयाच्या निदर्शनास आणून दिले. यावर केंद्राच्या वकिलांनी मध्य-पूर्वेतील बदलत्या परिस्थितीचा उल्लेख करत अधिक वेळ मागितला. मात्र, “प्रतिज्ञापत्र दाखल करण्यापासून नेमके काय अडथळे आहेत?” असा थेट सवाल करत न्यायालयाने सरकारची भूमिका स्पष्ट करण्यास भाग पाडले.

न्यायालयाने नमूद केले की, या प्रकरणात यापूर्वी तीन वेळा मुदत देऊनही केंद्राने प्रतिज्ञापत्र सादर केलेले नाही, ही बाब गंभीर आहे. पुढील तीन आठवड्यांची मुदत देण्याची केंद्राची मागणी फेटाळत खंडपीठाने “पुढील शुक्रवारी म्हणजेच ८ मेपर्यंत प्रतिज्ञापत्र दाखल करणे आवश्यक आहे,” असे स्पष्ट निर्देश दिले. तसेच, प्रतिज्ञापत्र उशिरा का दाखल झाले आणि आणखी वेळ का मागितला जात आहे, याचे कारणही लेखी स्वरूपात सादर करण्यास सांगितले. या प्रकरणाची पुढील सुनावणी ११ मे रोजी ठेवण्यात आली आहे.

दरम्यान, याचिकेत विमान कंपन्यांकडून करण्यात येणाऱ्या कथित मनमानी धोरणांवरही प्रश्नचिन्ह उपस्थित करण्यात आले आहे. इकॉनॉमी वर्गातील प्रवाशांसाठी मोफत चेक-इन सामानाची मर्यादा २५ किलोवरून १५ किलोपर्यंत कमी करण्यात आली असून, यामुळे पूर्वी तिकीटामध्ये समाविष्ट असलेली सेवा आता स्वतंत्र महसुलाचे साधन बनवण्यात आली आहे, असा दावा करण्यात आला आहे. तसेच, केवळ एका चेक-इन बॅगेजची परवानगी आणि त्याचा वापर न करणाऱ्या प्रवाशांना कोणतीही सवलत न देणे हे धोरण भेदभावपूर्ण असल्याचेही नमूद करण्यात आले आहे.

याचिकेत असेही म्हटले आहे की, सध्या कोणत्याही नियामक संस्थेकडे विमान भाडे किंवा पूरक शुल्कांवर नियंत्रण ठेवण्याचा अधिकार नसल्याने कंपन्यांना मनमानी दर आकारण्याचे मोकळे मैदान मिळाले आहे. डायनॅमिक प्राइसिंगच्या नावाखाली सणासुदीच्या किंवा आपत्कालीन काळात प्रचंड दरवाढ होत असून, त्याचा सर्वाधिक फटका सामान्य आणि तातडीने प्रवास करणाऱ्या प्रवाशांना बसतो. या पार्श्वभूमीवर राज्याने प्रभावी नियमन न करणे ही घटनात्मक जबाबदारीतील गंभीर त्रुटी असल्याचा आरोप याचिकेत करण्यात आला आहे.

यापूर्वीही सर्वोच्च न्यायालयाने विमान भाड्यांतील अवाजवी वाढ ही ‘शोषण’ असल्याचे निरीक्षण नोंदवत केंद्र सरकार, नागरी हवाई वाहतूक महासंचालनालय (डीजीसीए) आणि संबंधित प्राधिकरणांना भूमिका स्पष्ट करण्याचे निर्देश दिले होते. मात्र, अद्याप ठोस उत्तर न आल्याने न्यायालयाने नाराजी व्यक्त करत आता केंद्राला अंतिम मुदत घातली आहे.

## कर्नाटकात सध्या मुख्यमंत्री बदल नाही

■ दैनिक राज्य लोकतंत्र



**नवी दिल्ली :** काँग्रेस अध्यक्ष मल्लिकार्जुन खर्गे यांनी कर्नाटकातील नेतृत्व बदलाच्या चर्चांना तूर्तास पूर्णविराम देत सध्या तरी मुख्यमंत्री बदल होणार नसल्याचे स्पष्ट केले. पक्षातील नेतृत्वाचा वाद लवकरात लवकर सोडवला जाईल, असेही त्यांनी सांगितले.

चार राज्ये आणि एका केंद्रशासित प्रदेशातील विधानसभा निवडणुकांचे तसेच कर्नाटकातील दोन मतदारसंघांतील पोटनिवडणुकांचे निकाल ४ मे रोजी जाहीर होणार आहेत. या पार्श्वभूमीवर राज्यात संभाव्य नेतृत्वबदल आणि मंत्रिमंडळ फेरबदलाच्या चर्चा रंगल्या होत्या.

२०२३ च्या विधानसभा निवडणुकांनंतर मुख्यमंत्री सिद्धरामय्या आणि उपमुख्यमंत्री डी. के. शिवकुमार यांच्यात कथित सत्तावाटपाचा करार झाल्याची चर्चा असून, त्यानुसार शिवकुमार यांना पुढे मुख्यमंत्रीपद देण्याची मागणी त्यांच्या समर्थकांकडून होत आहे.

पत्रकारांशी बोलताना खर्गे म्हणाले की, सध्या राज्यात मुख्यमंत्री कार्यरत असून तातडीने बदलाचा प्रश्न उपस्थित होत नाही. पक्षश्रेष्ठी सोनिया गांधी आणि राहुल गांधी यांच्यासोबत चर्चा करूनच कोणताही निर्णय घेतला जाईल आणि त्यासाठी काही काळ लागेल.

दरम्यान, कर्नाटकमध्ये नेतृत्व संघर्ष तीव्र होत असल्याने काँग्रेस हायकमांडवर दबाव वाढला आहे. गृहमंत्री जी. परमेश्वर यांनी खर्गे मुख्यमंत्री झाल्यास पक्षातील सर्वजण त्यांचे स्वागत करतील, असे वक्तव्य केले होते. या सर्व घडामोडींमुळे सत्ताधारी काँग्रेस पक्षात अंतर्गत राजकीय हालचालींना वेग आला असून, पुढील काळात नेतृत्वाबाबत काय निर्णय घेतला जातो, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

# आय-पॅकच्या विनेश चंडेल यांना जामीन

■ दैनिक राज्य लोकतंत्र



**नवी दिल्ली :** इंडियन पॉलिटिकल ॲक्शन कमिटी (आय-पॅक) चे संचालक विनेश चंडेल यांना दिल्लीतील पटियाला हाऊस न्यायालयाने गुरुवारी नियमित जामीन मंजूर केला. अंमलबजावणी संचालनालयाने (ईडी) त्यांना १३ एप्रिल रोजी मनी लॉंड्रिंग प्रकरणात अटक केली होती.

अतिरिक्त सत्र न्यायाधीश अमित बन्सल यांनी आदेश देताना नमूद केले की, ईडीने जामिनाला विरोध केला नाही. त्यामुळे पीएमएलए कायद्यातील कठोर दुहेरी अटी या प्रकरणात लागू होत नसल्याचे न्यायालयाने स्पष्ट केले. चंडेल हे पीएसी कन्सल्टिंग प्रायव्हेट लिमिटेडचे संस्थापक असून त्यांच्याकडे ३३ टक्के भागभांडवल आहे. या कंपनीशी संबंधित आर्थिक गैरव्यवहारांच्या आरोपांवरून ईडीकडून तपास सुरू आहे. हे प्रकरण दिल्ली पोलिसांनी दाखल केलेल्या एफआयआरमधून पुढे आले आहे.

तपासादरम्यान कंपनीकडून घोषित व अघोषित निधी स्वीकारणे, तारण नसलेली कर्जे घेणे, बनावट पावत्यांचा वापर करणे तसेच तृतीय पक्षांमार्फत पैशांचा अपहार केल्याचे आरोप ईडीने केले आहेत. तसेच देशांतर्गत आणि आंतरराष्ट्रीय हवाला मार्गांचा वापर करून निधी हस्तांतरण केल्याचाही आरोप करण्यात आला आहे. ईडीच्या माहितीनुसार, या प्रकरणात अनेक कोटी रुपयांच्या मनी लॉंड्रिंगचा समावेश असून आतापर्यंत सुमारे ५० कोटी रुपयांची रक्कम जप्त करण्यात आली आहे. चंडेल यांनी २३ एप्रिल रोजी दिल्ली उच्च न्यायालयात जामिनासाठी अर्ज केला होता. दरम्यान, या प्रकरणाचा पुढील तपास सुरू आहे.

# माध्यम स्वातंत्र्य गेल्या २५ वर्षांत नीचांकी

■ दैनिक राज्य लोकतंत्र



**पॅरिस :** जगभरातील माध्यम स्वातंत्र्य गेल्या २५ वर्षांतील सर्वात खालच्या पातळीवर पोहोचल्याचा इशारा ‘रिपोर्टर्स विदाऊट बॉर्डर्स’ (आरएसएफ) या संस्थेने दिला आहे. संस्थेच्या ताज्या निर्देशांकानुसार, निम्म्याहून अधिक देशांमध्ये माध्यम स्वातंत्र्याची स्थिती ‘कठीण’ किंवा ‘अतिशय गंभीर’ श्रेणीत घसरली आहे.

आरएसएफने म्हटले आहे की, निर्देशांकाच्या २५ वर्षांच्या इतिहासात प्रथमच जागतिक सरासरी गुणसंख्या इतकी कमी झाली आहे. ज्या देशांमध्ये माध्यम स्वातंत्र्य ‘चांगले’ मानले जाते, अशा देशांमध्ये राहणाऱ्या लोकसंख्येचा वाटा २० टक्क्यांवरून एक टक्क्यापेक्षा कमी झाला आहे. उत्तर युरोपमधील नॉर्वेच्या नेतृत्वाखालील केवळ सात देश या ‘चांगल्या’ श्रेणीत कायम आहेत. याउलट, अनेक मोठ्या देशांमध्ये परिस्थिती खालावत चालली आहे.

अमेरिकेची स्थिती निर्देशांकात घसरून ६४ व्या स्थानावर आली आहे. संस्थेने अध्यक्ष ट्रम्प यांच्या पत्रकारांवरील “पद्धतशीर” हल्ल्यांचा उल्लेख केला असून, माध्यमांवरील दबाव, निधी कपात आणि पत्रकारांवरील कारवाईमुळे परिस्थिती बिघडल्याचे नमूद केले आहे. रशियामध्येही माध्यम स्वातंत्र्यावर कठोर निर्बंध असल्याचे आरएसएफने सांगितले आहे. एप्रिल २०२६ पर्यंत तेथे ४८ पत्रकार तुरुंगात असल्याची माहिती अहवालात देण्यात आली आहे. तसेच, साहेल प्रदेशातील नायजरमध्ये २०२६ मध्ये सर्वाधिक घसरण नोंदवण्यात आली असून, लष्करी राजवट आणि सशस्त्र गटांच्या दबावामुळे पत्रकारांना स्वातंत्र्याने काम करणे कठीण झाले आहे. जागतिक पातळीवर वाढत्या राजकीय दबाव, कायद्यांचा गैरवापर आणि पत्रकारांवरील कारवायांमुळे स्वतंत्र आणि निष्पक्ष पत्रकारितेसमोरील आव्हाने अधिक तीव्र होत असल्याचे या अहवालातून स्पष्ट झाले आहे.

# ईडी कारवाईवर राजकीय हस्तक्षेपाचा आरोप

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**नवी दिल्ली :** इंडियन पॉलिटिकल ॲक्शन कमिटी (आय-पॅक) च्या संचालकाला मिळालेल्या जामीनानंतर अंमलबजावणी संचालनालयाच्या (ईडी) कारवाईवर राजकीय हस्तक्षेपाचा आरोप आम आदमी पक्षाने केला आहे. ‘आप’ नेते सौरभ भारद्वाज यांनी गुरुवारी यासंदर्भात केंद्र सरकार आणि केंद्रीय यंत्रणांवर टीका केली.

भारद्वाज यांनी ‘एक्स’वरील पोस्टमध्ये म्हटले की, पश्चिम बंगाल निवडणुकांच्या दुसऱ्याच दिवशी आय-पॅकच्या संचालकाला पीएमएलए प्रकरणात जामीन मिळाला आणि ईडीने त्याला विरोध केला नाही. इतक्या कमी कालावधीत कनिष्ठ न्यायालयातून जामीन मिळणे असामान्य असल्याचा दावा त्यांनी केला. निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर केंद्रीय यंत्रणांचा गैरवापर झाल्याचा आरोप करत त्यांनी याला “लोकशाहीची थट्टा” असे संबोधले. आय-पॅकवर मतदानापूर्वी छापे टाकणे, अटक करणे आणि कर्मचाऱ्यांना चौकशीसाठी बोलावणे यामुळे संस्थेवर दबाव निर्माण झाल्याचा आरोपही त्यांनी केला.

दिल्लीतील पटियाला हाऊस न्यायालयाने आय-पॅकचे संचालक विनेश कुमार चंडेल यांना मनी लॉंड्रिंग प्रकरणात नियमित जामीन मंजूर केला आहे.

न्यायालयाने चंडेल यांना २ लाख रुपयांच्या जामीनपत्रावर आणि तेवढ्याच हमीवर जामीन दिला आहे. तसेच, तपासात सहकार्य करणे, पुराव्यांमध्ये हस्तक्षेप न करणे आणि न्यायालयाच्या परवानगीशिवाय देशाबाहेर न जाणे अशा अटी घालण्यात आल्या आहेत. या प्रकरणामुळे ईडीच्या कारवाईच्या वेळेबाबत आणि निवडणुकांच्या संदर्भातील भूमिकेबाबत राजकीय वाद निर्माण झाला असून, पुढील घडामोडीकडे लक्ष लागले आहे.

## मेघालयात ‘प्रगती’ बहुराष्ट्रीय लष्करी सराव

# भारताच्या ‘ॲक्ट ईस्ट’ धोरणाला बळ



■ दैनिक राज्य लोकतंत्र

**नवी दिल्ली :** भारताच्या ॲक्ट इस्ट पॉलिसीला गती देत भारतीय लष्कराच्या वतीने ‘प्रगती’ या बहुराष्ट्रीय लष्करी सरावाचे आयोजन मे महिन्यात करण्यात येणार आहे. मेघालयातील उमरोई येथील परदेशी प्रशिक्षण केंद्रात १८ ते ३१ मे दरम्यान हा सराव पार पडणार असून, भारतातील सर्वात मोठ्या संयुक्त लष्करी सरावांपैकी एक म्हणून याकडे पाहिले जात आहे.

या सरावात भारतासह नेपाळ, भूतान, म्यानमार, श्रीलंका या शेजारी देशांबरोबरच फिलीपिन्स, व्हिएतनाम, मलेशिया, कंबोडिया आणि लाओस या आग्नेय आशियाई देशांच्या सैन्यांचा सहभाग असणार आहे. त्यामुळे इंडो-पॅसिफिक क्षेत्रातील लष्करी सहकार्य अधिक दृढ होण्याची अपेक्षा व्यक्त होत आहे.

‘प्रगती’ सरावात दहशतवादविरोधी कारवाया, जंगल युद्धतंत्र, उप-पारंपरिक युद्ध तसेच मानवतावादी मदत व आपत्ती निवारण (एचएडीआर) या बाबींवर विशेष भर दिला जाणार आहे. विविध देशांच्या सैन्यांमध्ये समन्वय वाढवून संयुक्त कारवायांची क्षमता विकसित करणे हा या सरावाचा मुख्य उद्देश आहे.

हा सराव आसियान संरक्षण मंत्र्यांची बैठक-प्लस या मंचाशी संबंधित व्यापक सामरिक सहकार्याचा भाग मानला जात असून, इंडो-पॅसिफिक क्षेत्रात वाढत्या भू-राजकीय स्पर्धेच्या पार्श्वभूमीवर भारताची भूमिका अधिक मजबूत करण्याचा प्रयत्न असल्याचे मानले जात आहे.

दरम्यान, या सरावासोबत दोन दिवसांचे संरक्षण उद्योग प्रदर्शनही आयोजित करण्यात येणार आहे. यात भारतातील स्वदेशी लष्करी तंत्रज्ञान आणि शस्त्रास्त्रांचे प्रदर्शन होणार आहे. ब्रह्मोस क्षेपणास्त्रासारख्या प्रणालींमुळे भारताची संरक्षण निर्यात वाढत असून, फिलीपिन्सनंतर व्हिएतनामसारखे देश संभाव्य खरेदीदार म्हणून पुढे येत आहेत.

‘प्रगती’ हा भारताच्या संरक्षण, परराष्ट्र आणि आर्थिक धोरणांचा संगम ठरणारा महत्त्वपूर्ण उपक्रम ठरत आहे. इंडो-पॅसिफिक क्षेत्रात भारताची उपस्थिती अधिक बळकट करण्यास या सरावाची मदत होणार आहे.

# पवन खेरा अटकपूर्व जामीन अर्जावर निकाल राखीव

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**नवी दिल्ली :** काँग्रेस नेते पवन खेरा यांनी दाखल केलेल्या अटकपूर्व जामीन अर्जावर सर्वोच्च न्यायालयाने गुरुवारी निकाल राखून ठेवला. आसामचे मुख्यमंत्री हिमंता बिस्वा सरमा यांच्या पत्नी रिनिकी भुयान सरमा यांच्यावरील आरोपांनंतर सुरू झालेल्या फौजदारी तपासाच्या पार्श्वभूमीवर ही सुनावणी झाली.

न्यायमूर्ती जे. के. माहेश्वरी आणि ए. एस. चांदुरकर यांच्या खंडपीठासमोर खेरा यांच्या वकिलांनी आणि आसाम पोलिसांच्या बाजूने



सॉलिसिटर जनरल यांनी सविस्तर युक्तिवाद मांडले. सुनावणी पूर्ण झाल्यानंतर न्यायालयाने निकाल राखून ठेवला.

पत्रकार परिषदेत खेरा यांनी रिनिकी भुयान सरमा यांच्याकडे परदेशी पासपोर्ट आणि परदेशातील अघोषित मालमत्ता असल्याचा आरोप केला होता. या आरोपांनंतर आसाम पोलिसांनी गुन्हा दाखल करून तपास सुरू केला.

खेरा यांच्यावतीने ज्येष्ठ वकील अभिषेक मनु सिंघवी यांनी हे प्रकरण राजकीय द्वेषातून उभे करण्यात आल्याचा दावा केला. संबंधित विधाने वादग्रस्त असली तरी ती मानहानीच्या चौकटीत येतात आणि त्यासाठी कठोर गुन्हे दाखल करणे योग्य नसल्याचे त्यांनी नमूद केले. तसेच अटकेची गरज नसल्याचेही त्यांनी स्पष्ट केले. आसाम पोलिसांच्या वतीने सॉलिसिटर जनरल तुषार मेहता यांनी गुन्ह्याचे गांभीर्य अधोरेखित करत कोठडीतील चौकशी आवश्यक असल्याचे सांगितले. खेरा यांनी सादर केलेले पासपोर्ट बनावट असल्याचा दावा करत या प्रकरणात व्यापक तपासाची गरज असल्याचे त्यांनी मांडले.

यापूर्वी २४ एप्रिल रोजी गुवाहाटी उच्च न्यायालयाने खेरा यांचा जामीन अर्ज फेटाळला होता. तपासासाठी कोठडी आवश्यक असल्याचे उच्च न्यायालयाने नमूद केले होते. सर्वोच्च न्यायालय आता खेरा यांना अटकेपासून संरक्षण द्यायचे की पोलिसांना कोठडीतील चौकशीची परवानगी द्यायची, यावर निर्णय देणार आहे.

## मेघालयातील धबधब्यात तरुणी बेपत्ता

**शिलाँग :** उत्तर प्रदेशातील फिरोजाबाद येथील एक १५ वर्षीय मुलगी बुधवारी मेघालयातील सोहरा येथे फोटो काढत असताना धबधब्यात पडल्याने बेपत्ता झाली, असे अधिकाऱ्यांनी सांगितले. ही घटना निसर्गरम्य वेई सॉडोंग धबधब्यावर घडली, जिथे ती मुलगी तिच्या कुटुंबासोबत सुट्टी घालवण्यासाठी गेली होती, असे त्यांनी सांगितले. फोटो काढण्याच्या प्रयत्नात तिचा पाय घसरला आणि ती एका खोल नैसर्गिक डबक्यात पडली. दिवसभर शोध आणि बचाव कार्य सुरू होते.

## एनसीएलटी विलंबाची दखल

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**नवी दिल्ली :** दिवाळखोरी आणि नादारी संहिता (आयबीसी) अंतर्गत ठराव योजनांच्या मंजुरीत राष्ट्रीय कंपनी कायदा न्यायाधिकरणाच्या (एनसीएलटी) खंडपीठांकडून होत असलेल्या विलंबाची सर्वोच्च न्यायालयाने स्वतःहून दखल घेतली आहे. परिस्थिती गंभीर असल्याचे नमूद करत न्यायालयाने तातडीने उपाययोजना करण्याची गरज अधोरेखित केली.

न्यायमूर्ती जे. बी. परडीवाला आणि के. व्ही. विश्वनाथन यांच्या खंडपीठाने देशभरातील एनसीएलटी खंडपीठांमध्ये मनुष्यबळ आणि पायाभूत सुविधांची कमतरता असल्याचे निदर्शनास आणले. सततच्या विलंबामुळे आयबीसीचा मूळ उद्देशच बाधित होण्याची शक्यता असल्याचा इशाराही न्यायालयाने दिला.

ठराव योजना म्हणजे संकटग्रस्त कंपन्यांच्या पुनर्रचना किंवा अधिग्रहणासाठी सादर केला जाणारा वैधानिक प्रस्ताव असून, त्याच्या मंजुरीत होणारा विलंब संपूर्ण प्रक्रियेवर परिणाम करत असल्याचे न्यायालयाने नमूद केले.

एनसीएलटीच्या प्रधान खंडपीठाने सादर केलेल्या अहवालानुसार देशभरात ३८३ ठराव योजना मंजुरीच्या प्रतीक्षेत आहेत. या प्रकरणांमध्ये एक महिन्यापासून ते ७०० दिवसांहून अधिक विलंब झाल्याचे समोर आले आहे. या प्रकरणाला योग्य खंडपीठाकडे वर्ग करण्यासाठी ते सरन्यायाधीश सूर्यकांत यांच्या समोर ठेवण्याचे निर्देश देण्यात आले आहेत.

## कायद्यात बदलाचा विचार करा : सर्वोच्च न्यायालय

# त्या मुलीच्या गर्भपात प्रकरणी एम्सची याचिका फेटाळली

■ दैनिक राज्य लोकतंत्र



**नवी दिल्ली :** बलात्कारातून गर्भवती झालेल्या १५ वर्षीय अल्पवयीन मुलीच्या ३० आठवड्यांच्या गर्भपातासंदर्भात एम्सने दाखल केलेली उपचारात्मक याचिका सर्वोच्च न्यायालयाने गुरुवारी फेटाळून लावली. तसेच, २० आठवड्यांहून अधिक कालावधीच्या गर्भधारणेच्या गर्भपातास परवानगी देण्यासाठी कायद्यात सुधारणा करण्याचा विचार करावा, असे केंद्र सरकारला सुचवले.

सरन्यायाधीश सूर्यकांत आणि न्यायमूर्ती जॉयमाल्य बागची यांच्या खंडपीठाने बलात्कारामुळे झालेल्या गर्भधारणेच्या प्रकरणांमध्ये आदर्शपणे कालमर्यादा नसावी, असे निरीक्षण नोंदवले. कायदा बदलत्या काळाशी सुसंगत असला पाहिजे, असेही न्यायालयाने स्पष्ट केले. या प्रकरणात न्यायालयाने तीव्र संवेदना व्यक्त करत अल्पवयीन मुलीला नको असलेला गर्भ चालू ठेवण्यास भाग पाडणे तिच्या प्रतिष्ठा, स्वायत्तता आणि दीर्घकालीन हिताच्या विरोधात असल्याचे नमूद केले. गर्भधारणा सुरू ठेवायची की संपुष्टात आणायची, याचा निर्णय पीडितेचाच असला पाहिजे, यावर खंडपीठाने भर दिला. एम्सने सुनावणीदरम्यान ३० आठवड्यांत गर्भपात करणे वैद्यकीयदृष्ट्या जोखमीचे असल्याचे सांगितले. गर्भाची स्थिती स्थिर असून नवजात शिशु वाचू शकतो, मात्र आईला आरोग्यविषयक गुंतागुंती उद्भवू शकतात, असे मत व्यक्त करण्यात आले. दत्तक देण्याचा पर्यायही सुचवण्यात आला होता. तथापि, न्यायालयाने नमूद केले की, अल्पवयीन मुलीवर जबरदस्तीने गर्भधारणा लादल्यास तिला आयुष्यभर मानसिक व भावनिक त्रास सहन करावा लागू शकतो. जर गर्भपातामुळे आईच्या आरोग्यावर कायमस्वरूपी परिणाम होत नसेल, तर प्रक्रिया पुढे सुरू ठेवता येईल, असेही न्यायालयाने स्पष्ट केले. अल्पवयीन पीडितेच्या प्रकरणाचे गांभीर्य लक्षात घेता, माध्यमांनी वार्तांकन करताना संयम आणि संवेदनशीलता राखावी, असे आवाहनही न्यायालयाने केले. यापूर्वी २४ एप्रिल रोजी सर्वोच्च न्यायालयाने या मुलीला २९ आठवड्यांच्या गर्भपाताची परवानगी दिली होती. कोणत्याही महिलेला, विशेषतः अल्पवयीन मुलीला, तिच्या इच्छेविरुद्ध गर्भ पूर्ण करण्यास भाग पाडता येणार नाही, असे न्यायालयाने तेव्हा स्पष्ट केले होते.